




पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २७६ ■ बुधवार, दि.१५ एप्रिल २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.-MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com


## ६०० शिक्षकांची बनावट आयडी तयार करून लाटला कोट्यवधींचा पगार!

**जळगाव :** जिल्ह्यातील काही शाळांनी कोणतीही पडताळणी न करता शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती केल्याचे तपासात समोर आले आहे. बनावट कागदपत्रांच्या आधारे ६०० हून अधिक शिक्षकांचे बनावट आयडी तयार करून कोट्यवधींचा पगार लाटून शासनाची फवणूक केल्याचे उघड झाले आहे. या शालार्थ घोटाळ्याप्रकरणी नाशिक एसआयटीतर्फे सुनावणीसाठी नोटीस पाठवण्यात आली आहे. जळगावच्या माध्यमिक शिक्षण विभागातील आजी-माजी शिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी आणि कर्मचाऱ्यांसह तब्बल ४८ जणांना नोटीस पाठवण्यात आली आहे.

# परतवाडा प्रकरणातील मुख्य आरोपीच्या घरावर बुलडोझर कारवाई!







प्रतिनिधी १५ एप्रिल

**परतवाडा :** जिल्ह्यातील परतवाडा येथून एक संतापजनक 'व्हिडीओकांड' समोर आले आहे. एका १९ वर्षीय तरुणाने अनेक तरुणींसोबतचे आक्षेपार्ह व्हिडीओ व अनेक आक्षेपार्ह फोटो सोशल मीडियावर व्हायरल केल्याचे समोर आले आहे. या प्रकरणात पोलिसांनी मुख्य आरोपीसह चौघांना अटक केली आहे. मुख्य आरोपी अयानला २१ एप्रिलपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. दरम्यान, आता आरोपी अयान याच्या घरावर बुलडोझर कारवाईस सुरूवात केली आहे.

आरोपी अयान याच्या घरावर नगरपालिकेने मोठी कारवाई सुरू केली आहे. अयान याचे घर दोन मजल्याचे आहे. दुसऱ्या मजल्याची परवानगी घेतली नसल्याचा आरोप करण्यात आला असून आता नगरपालिकेने कारवाई सुरू केली आहे. भाजपा आमदार प्रवीण तायडे यांनी याबाबत आरोप केले आहेत. दरम्यान, आता नगरपालिकेने अतिक्रमण पूर्ण हटवले आहे. आता अयान याच्या घरावर दुसऱ्या मजल्याबाबत नोटीस लावली आहे. या नोटीसीची वेळ संपल्यानंतर दुसऱ्या मजल्यावरही बुलडोझर कारवाई करण्यात येणार आहे.

एकीकडे अशोक खरात प्रकरण देशभर गाजत असताना अमरावती जिल्ह्यातील परतवाडा येथून एक धक्कादायक आणि संतापजनक प्रकार समोर आला आहे. एका १९ वर्षीय तरुणाने अनेक तरुणींसोबतचे आक्षेपार्ह व्हिडीओ व अनेक आक्षेपार्ह फोटो सोशल मीडियावर व्हायरल केल्याने मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणात पोलिसांनी तत्परता दाखवत मुख्य आरोपीसह चौघांना अटक केली आहे.

परतवाडा येथील अयान अहमद तनवीर अहमद (१९) याने अनेक मुलींशी जवळीक साधून त्यांचे आक्षेपार्ह व्हिडीओ आणि फोटो काढले होते. हे व्हिडीओ अयानचा मित्र उजेर खान इकबाल खान (२०) याने सोशल मीडियावर व्हायरल केले. गेल्या तीन दिवसांपासून हे व्हिडीओ वणव्यासारखे पसरल्याने दहशतीचे आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले होते. आता या प्रकरणात शहाद आणि तबरेज या दोघांना अटक करण्यात आली आहे. याप्रकरणी राज्यसभा खासदार अनिल बोंडे यांनीही याप्रकरणी कठोर कारवाईची मागणी केली होती. 'पीडितांनी किंवा त्यांच्या कुटुंबीयांनी घाबरून न जाता महिला पोलिस अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा. तुमची ओळख पूर्णपणे गोपनीय ठेवली जाईल, असे आवाहन जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी केले आहे. या प्रकरणात आणखी कोणाचा हात आहे का, याचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तपासाची चक्रे वेगवान केली आहेत.

आरोपींचे मोबाईल जप्त केले असून सर्व पुरावे फॉरेन्सिक लॅबला पाठवण्यात येत आहेत. सोशल मीडियावरून हे व्हिडिओ हटवण्यासाठी संबंधित कंपन्यांशी पत्रव्यवहार करण्यात आला आहे. पीडितांच्या कुटुंबीयांनी न घाबरता महिला अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, त्यांची ओळख गुप्त ठेवली जाईल.

**विशाल आनंद,**
जिल्हा पोलिस अधीक्षक, अमरावती

### पोलिसांची 'सुमोटो' कारवाई

प्रकरणाचे गांभीर्य ओळखून आणि अद्याप कोणतीही पीडिता तक्रार देण्यासाठी समोर आलेली नसताना, अमरावतीचे पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांनी स्वतः पुढाकार घेतला. परतवाडा पोलिसांनी 'सुमोटो' कारवाई करत १३ एप्रिल रोजी रात्री अयान अहमदला बेड्या ठोकल्या. त्यानंतर १४ एप्रिल रोजी व्हिडीओ व्हायरल करणाऱ्या उजेर खानलाही अटक करण्यात आली. मुख्य आरोपी अयानला २१ एप्रिलपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

### तपासात धक्कादायक खुलासे

पोलिस अधीक्षकांनी दिलेल्या माहितीनुसार, या नराधमांनी पीडित मुलींच्या वैयक्तिक आयुष्याचा बाजार मांडला होता. आतापर्यंत १८ आक्षेपार्ह व्हिडीओ आणि ३९ फोटोग्राफ्स समोर आले आहेत. प्रथमदर्शनी पीडितांची संख्या ८ असून, तपासादरम्यान हा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. काही मुली या अल्पवयीन असण्याची शक्यता असल्याने, पोलिसांनी या प्रकरणात पोक्सो कायद्यांतर्गत कलमे लावली आहेत.



अटक करण्यात आलेल्या आरोपींची संख्या झाली चार व्हायरल व्हिडिओ प्रकरणात आणखीन दोन आरोपींना अटक करण्यात परतवाडा पोलिसांना यश आले आहे. आता अटक केलेल्या आरोपींची संख्या ४ वर पोहोचली आहे. अयान अहमद आणि उजेर खान यांच्यानंतर आता शहाद आणि तबरेज यांना अटक करण्यात आली आहे.

### पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न

आरोपींनी काही व्हिडीओ सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरून डिलिट केल्याचे समजते. मात्र, पोलिसांनी त्यांचे मोबाइल जप्त केले असून, ते फॉरेन्सिक लॅबकडे पाठवले जाणार आहेत. पोलिसांनी संबंधित सोशल मीडिया कंपन्यांशी पत्रव्यवहार करून आक्षेपार्ह मजकूर हटवण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

### दोषींवर होणार कठोर कारवाई- महसूलमंत्री बावनकुळे

अमरावती जिल्ह्यातील परतवाडा येथील अल्पवयीन मुलींवरील अत्याचाराचे प्रकरण सरकारने गंभीरतेने घेतले आहे. या प्रकरणात दोषींना लवकरात लवकर कठोर शिक्षा मिळावी, यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचा दावा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला आहे. नागपुरात ते मंगळवारी प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

# लोकसभेत महिला आरक्षण सुधारणा विधेयक उद्या मांडणार!

## लोकसभेच्या जागा 850 होणार, राज्यातील खासदार 48 वरुन 72 वर



### महिलांसाठी किमान २७३ राखीव जागा

मतदारसंघ फेररचनेनंतर लोकसभेच्या जागांची संख्या ८१६ असेल असा अंदाज होता, पण आता हा आकडा ८५० असेल अशी चर्चा सुरू आहे. याअंतर्गत, ८१५ जागा राज्यांमध्ये, तर ३५ जागा केंद्रशासित प्रदेशांमधून मिळतील. त्यापैकी एकट्या राजधानी दिल्लीत लोकसभेच्या ७ जागा ११ पर्यंत वाढतील. नारीशक्ती वंदन कायद्यांतर्गत, लोकसभेतील ३३ टक्के जागा (किमान २७३) महिलांसाठी राखीव असतील. या सर्व तरतुदी विधानसभांनाही लागू होतील.

प्रतिनिधी १५ एप्रिल

**नवी दिल्ली :** लोकसभा आणि राज्ये तसेच केंद्रशासित प्रदेशांच्या विधानसभांमध्ये महिलांसाठी ३३ टक्के आरक्षण २०२९ च्या सार्वत्रिक निवडणुकीपासूनच लागू करण्यासाठीचे महत्त्वाकांक्षी विधेयके उद्या, गुरुवारी संसदेत मांडण्यात येणार आहेत. १३१ व्या घटना दुरुस्तीसह या विधेयकांना मंजुरी मिळाल्यावर संसदेच्या कनिष्ठ सभागृहातील सदस्यांची संख्या सध्याच्या ५४३ वरून ८५० पर्यंत वाढवण्याची तरतूद प्रत्यक्षात येण्याचा मार्ग मोकळा होईल.

संसदेत मांडल्या जाणाऱ्या महत्त्वाकांक्षी विधेयकांचे मसुदे सरकारने संसद सदस्यांना मंगळवारी उपलब्ध करून दिले. मतदारसंघ फेररचनेमुळे महाराष्ट्रातील संभाव्य खासदारांची संख्या सध्याच्या ४८ वरून ७२ पर्यंत वाढणार आहे. मात्र, तमिळनाडूसह काही दक्षिण भारतीय राज्यांनी मतदारसंघ फेररचनेमुळे आपल्या राज्यांतील लोकसभेच्या जागा कमी होण्याबद्दल चिंता व्यक्त करताना संबंधित विधेयकांना तीव्र विरोध कायम ठेवला आहे. दरम्यान, संसदेचे विशेष अधिवेशन गुरुवारी सुरू होत असून ते तीन दिवस चालेल. या अधिवेशनात पहिल्याच दिवशी लोकसभेत महिला आरक्षण सुधारणा विधेयक मांडले जाईल.

## यवतमाळात भीषण अपघात; वडील व चिमुकली ठार, पत्नी गंभीर

प्रतिनिधी १५ एप्रिल

**यवतमाळ :** घाटंजी तालुक्यात मंगळवारी (दि. १४ एप्रिल) सायंकाळी साडेसातच्या सुमारास भीषण अपघात झाला. या अपघातात एका कुटुंबातील वडील व पाच महिन्यांच्या चिमुकलीचा जागीच मृत्यू झाला असून पत्नी गंभीर जखमी झाली आहे. जखमी महिलेवर यवतमाळ येथे उपचार सुरू आहेत. साईकिरण गोडगुल्ला (वय अंदाजे ३०), मुलगी हंसिका (वय ५ महिने) असे मृतकाचे नाव मृतकाचे नाव आहे. तर मृतकाची पत्नी अनुष्का साईकिरण गोडगुल्ला (वय २५) या गंभीर जखमी झाल्या असून त्यांना तातडीने यवतमाळ येथे हलविण्यात आले. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित कुटुंब साखरा येथून आपल्या मूळ गावी आदिलाबादकडे जात होते. त्याचवेळी पांढरकवडा-घाटंजी मार्गावरून येणाऱ्या बोरिंग गाडी (क्र. र्खें ०१ श्ड ३९८७) आणि स्विफ्ट डिझायर (क्र. ऊण ०३ ँ ७५२४) यांच्यात समोरासमोर जोरदार धडक झाली. अपघाताची तीव्रता इतकी होती की, घटनास्थळीच दोघांचा मृत्यू झाला.

## रुपाली चाकणकरांना नोटीस का नाही?

**नाशिक :** भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात राजकीय वाद अधिक तीव्र होताना दिसत आहे. या प्रकरणात प्रतिभा चाकणकर यांची शिर्डी पोलिसांकडून तब्बल आठ तास चौकशी करण्यात आली. मात्र अद्याप रुपाली चाकणकर यांना चौकशीसाठी का बोलावण्यात आले नाही, असा सवाल विरोधकांकडून उपस्थित करण्यात येत आहे.ष्या पार्श्वभूमीवर तृप्ती देसाई आणि रुपाली ठोंबरे यांनी तपासाबाबत गंभीर आरोप केले आहेत. त्यांच्या मते, तपास केवळ अशोक खरात यांच्या बाजूने सुरू असून काही राजकीय व्यक्तींना वाचवण्याचा प्रयत्न केला जात आहे.

# धक्कादायक; चक्क दीड कोटींची इमारतच झाली लंपास?

## आमदार हरीश पिंपळेंच्या पत्रानंतर पंचनाम्याचे आदेश!



### जि. प. सार्वजनिक बांधकाम विभागाचा भोंगळ कारभार

दीड कोटी रुपयांचा निधी खर्च होऊनही इमारतीचा थांगपत्ता लागत नसल्याने जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यक्षमतेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. इमारत खरंच अस्तित्वात आहे की कंत्राटदार आणि अधिकाऱ्यांच्या संगनमताने हा निधी हडप करण्यात आला? हे आता १५ एप्रिलच्या पंचनाम्यानंतरच स्पष्ट होईल. या प्रकरणाने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली असून, 'ती' दीड कोटींची इमारत शोधण्याचे मोठे आव्हान आता तहसीलदारांसमोर आहे.

प्रतिनिधी १५ एप्रिल

**अकोला:** एखाद्या वस्तूची चोरी होणे सामान्य आहे, मात्र चक्क १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून उभी राहिलेली दीड कोटींची इमारतच 'गायब' झाल्याचा खळबळजनक प्रकार मूर्तीजापूर तालुक्यात समोर आला आहे. 'दीड कोटींची इमारत गेली कुठे?' असा संतप्त सवाल विचारत आमदार हरीश पिंपळे यांनी प्रशासनाला धारेवर धरले असून, आता ही इमारत शोधण्यासाठी प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन पंचनामा करण्याचे आदेश तहसीलदारांनी दिले आहेत.

सन २०२२-२३ च्या १५ व्या वित्त आयोगांतर्गत हातगाव (ता. मूर्तीजापूर) येथे एका भव्य सभागृहाचे बांधकाम मंजूर करण्यात आले होते. कागदोपत्री या कामासाठी निधी खर्ची पडला असून, कंत्राटदाराला बिलही अदा करण्यात आल्याची चर्चा आहे. मात्र, प्रत्यक्षात हे सभागृह कुठे बांधले गेले आहे, याची कोणतीही माहिती किंवा ठिकाण समोर येत नाहीये. एका वजनदार नेत्याच्या वरदहस्ताने ही इमारत केवळ कागदावरच राहिली की काय, अशी शंका आता उपस्थित केली जात आहे. आमदारांच्या पत्राने यंत्रणा हादरली. मुर्तीजापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार हरीश मारोतीआप्पा पिंपळे यांनी यासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयाकडे तक्रार केली होती. १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून होणाऱ्या या कामाची माहिती वारंवार मागूनही प्रशासनाकडून ती दिली जात नव्हती. अखेर आमदारांनी 'दीड कोटींची इमारत नेमकी गेली कुठे?' असा सवाल उपस्थित केल्यानंतर प्रशासकीय यंत्रणेची धावपळ उडाली आहे.

आमदारांच्या तक्रारीची दखल घेत तहसीलदार मूर्तीजापूर यांनी या प्रकरणाच्या चौकशीसाठी कंबर कसली आहे. त्यांनी १३ एप्रिल २०२६ रोजी एक तातडीचे पत्र काढून संबंधित सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांना १५ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता हातगाव ग्रामपंचायत कार्यालयात उपस्थित राहण्याचे आदेश दिले आहेत. या शोधमोहिमेसाठी आणि पंचनाम्यासाठी खालील विभागांना पाचारण करण्यात आले आहे. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मूर्तीजापूर उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग. ठाणेदार, पोलीस स्टेशन, मूर्तीजापूर शहर. हातगावचे सरपंच, सचिव, तलाठी आणि पोलीस पाटील यांना बोलविले आहे.

## ठाकरे गटात मोठ्या फेरबदलाचे संकेत!

**मुंबई :** महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या शिवसेना ठाकरे गटात पक्षांतर्गत मोठे बदल होणार असल्याची चर्चा रंगली आहे. येत्या जून महिन्यात होणाऱ्या पक्षाच्या कार्यकारिणीच्या बैठकीत आदित्य ठाकरे यांना मोठी जबाबदारी सोपवली जाण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, आदित्य ठाकरे यांची पक्षाच्या कार्याध्यक्ष पदी नियुक्ती करण्याचा ठराव या बैठकीत एकमताने मंजूर केला जाऊ शकतो, असे बोलले जात आहे.

## अधीक्षक अभियंत्यांच्या बेजबाबदारपणामुळे रस्ते बांधकामाचा वाद

### तातडीने कागदपत्रांची मागणी; १५ एप्रिलपासून लवादासमोर सुनावणी

प्रतिनिधी १५ एप्रिल

**अकोला:** सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रेडवा ते कारंजा महत्त्वाच्या रस्ते प्रकल्पाबाबत सुरू असलेल्या लवाद प्रकरणाला आता वेग आला आहे.

या प्रकरणातील पुराव्यांची आणि साक्षीदारांची साक्ष नोंदवण्यासाठी एप्रिल महिन्यात सलग तीन दिवस बैठकांचे आयोजन करण्यात आले असून प्रकल्पाचा नकाशा आणि इतर तांत्रिक कागदपत्रांची तातडीने मागणी केली आहे.अधिक्षक अभियंत्यांच्या बेजबाबदारपणामुळे आणि आडमुठ्या धोरणाुळे व विशिष्ट कंत्राटदाराच्या फायद्यासाठी सरकार अडचणीत आल्याचे चित्र आहे.

या सर्व प्रकरणात कंत्राटदाराला फायदा पोहचविण्याचा उद्देश होता की अधिकाऱ्यांना याची ही चौकशी राज्य सरकारने करण्याची गरज आता व्यक्त केली जात आहे. कंत्राटदाराला कोणी लवादासमोर पाठविले आणि का याचा शोध घेतल्यास मोठे घबाड बाहेर येऊ शकते.रेडवा ते कारंजा या ४८ किलोमीटर लांबीच्या रस्ते प्रकल्पाच्या कामावरून कंत्राटदार आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यात वाद निर्माण झाला आहे. हे प्रकरण सध्या लवाद न्यायाधिकरणासमोर प्रलंबित आहे. या प्रकरणातील प्रतिवाद्यांचे अधिकृत प्रतिज्ञापत्र आता प्राप्त झाले असून ते न्यायालयाल

। सादर करण्यात आले आहे.या प्रकरणातील साक्ष नोंदवण्यासाठी लवादाने १५ एप्रिल, २७ एप्रिल आणि २८ एप्रिल २०२६ या तारखा निश्चित केल्या आहेत. या सुनावणीसाठी बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना व साक्षीदारांना प्रत्यक्ष हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे या प्रकरणाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

CMYK CMYK

२
सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा
बुधवार, दि. १५ एप्रिल २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

भारतामधील सामाजिक चळवळीमध्ये सहभागी झालेले नेतृत्व राजकारणात कृतीशील होते. यांची ठळक उदाहरणे म्हणजे महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही दोन दिसून येतात या दोन उदाहरणांच्या आधारे असेही म्हणता येते कि सामाजिक चळवळी हे विध्याक्षेत्र राजकारणचा कणा आहे. तसेच भारतीय स्वातंत्र्य चळवळ आणि दलित चळवळ यामधून उदारमतवाद, लोकशाही, सामाजिक न्याय, घटनावाद अशा आधुनिक विचारप्रणालीचे स्वतंत्र्य असे भारतीय अर्थ देखील अभिव्यक्त झाले आहेत. तर हिंदुत्व चळवळीमध्ये राजकारण या क्षेत्राबद्दल आरंभी मतभिन्नता होती. बहुजन चळवळ ही राजकारणापासून अलिप्त राहण्याची भूमिका घेत होती. दुसरीकडे सावकरनिष्ठ हिंदू परिवार राजकारणाशी जुळवून घेत होता. स्वतात्रोत्तर काळात मात्र सर्वच हिंदुत्व परिवाराने राजकारणाशी संबंध प्रस्थापित केले.

# देशात बहुजनांची सत्ता स्थापनेसाठी डॉ. आंबेडकर निर्मित सामाजिक चळवळ

महत्वाचे म्हणजे बहुजन चळवळीचा विस्तार होण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपणाला त्रीसुत्री आखुन दिली आहे; ती म्हणजे १.समता सैनीक दल (SSD), २.रिप्बलीकन पार्टी ऑफ इंडीया (RPI) आणि ३. भारतीय बौध्दमहा सभा. (SSD) समता सैनीक दल हे RPI शी जोडले जाईल, कारण बहुजन चळवळ आणि राजकारण यांचे संबंध कसे असावेत हा मुख्य कळीचा प्रश्न होता. सामाजीक चळवळ बळकट करण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी SSD ची स्थापना १९२७ मधेच केली आहे. याचा संदर्भ डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन व भाषण खंड १७ भाग ३, पृष्ठ ५६६ वर पहावयास मिळेल. समता सैनीक दल हे मुख्य संघटन आहे. त्याची कलमे १ ते १२ दिलेली आहेत त्यामधे धेय्य, सभासदत्व, प्रशिक्षण, रचना, सभा, दैनीक वेळापत्रक, शिस्त, गणवेश, निधी , ध्वज व प्रतीज्ञा या कलमानुसार जो चालेल तोच खरी बाबासाहेबांची चळवळ टिकवु शकतो व हा रथ पुढे नेऊ शकतो आणि आपले वर्चस्व प्रस्थापित करू शकतो. परंतु आज कोणीही या नुसार देशात काम करताना दिसत नाही. प्रत्येकांनी वेगवेगळ्या प्रकारची गट - तट निर्माण केलेली आहेत. जो तो मीच खरा हे सिध्द करतांना दिसत आहे. डॉ. आंबेडकरांनी रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडीया या राजकीय पक्षाची स्थापना केली आहे, परंतु खरी कुणीच चालवीतांना दिसत नाही. मग प्रश्न आहे बाबासाहेबांनी सांगितलेल्या प्रमाणे ही चळवळ कोण चालवीतांना दिसतो? तर खरे आहे ती म्हणजे RSS, ऐकुण आश्चर्य वाटले असेल. खरच SSD च्या कलमानुसार आपण चालली वागलो तर संपुर्ण भारत देशावर राज्य करण्याची ताकद आपल्याला डॉ. आंबेडरांनी SSD च्या स्वरूपात दिली आहे. समता सैनीक दल ही एक सामाजीक चळवळ आहे, हे संघटन प्रत्तेक व्यक्तीला प्रशिक्षीत करून राजकीय संघटनासाठी तयार करतो. समता सैनीक दलाचे प्रशिक्षण हे १.बौद्धीक २.शारारीक ३.लष्करी अशा तीन प्रकारचे आहे.



प्रशिक्षीत सैनीक हा अतीशय चांगल्या प्रकारे राजकीय चळवळ स्थपीत करू शकतो. या साठी मी आपल्याला भारताचे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांचे ऊदाहरण ठेऊ शकतो. देशात बहुजनांची दलीतांची सत्ता स्थापित करावयाची असेल तर, असा रोख ठोक प्रभावशाली राजकीय सैनीक फक्त समता सैनीक दलामधुनच तयार होऊ शकतो व बहुजनांची सामाजीक चळवळ उभी करू शकतो. यासाठी प्रत्तेक घरातील १८ वर्ष पुर्ण असलेला व्यक्ती हा सैनीक होऊ शकतो. आज गटागटात फक्त समता सैनिक दल नावाचे वेगवेगळे संघटक तयार होत आहेत परंतु आज SSD फक्त एक सुरक्षा रक्षक (GUARD) चेच कम करतांना दिसत आहे. अनेक असे राजकीय पक्ष जसे की RPIA,B किंवा ण निर्माण झाल्या आहेत आणि जो तो बाबासाहेबांचे समता सैनीक दल काहीतरी आहे, हा दिखावा दाखवीण्याठी त्याला एएअ्चा गणवेशधारी बनवील्या जात आहे. परंतू SSD शी राजकीय पक्ष जोडल्या जाईल, राजकीय पक्षावर नियंत्रन समता सैनीक दलाचे राहील हे कुणीच मानत नाही, किंवा डॉक्टर आंबेडकरांनी सांगितलेल्या कार्याप्रमाणे चालत नाही. कोणताही राजकीय पक्ष हा SSD ला प्राधान्य देत नाही. आणि याच कारणामुळे आज डॉ. आंबेडकरांनी दिलेल्या सामाजीक चळवळीचा रथ चीखलात फसलेला दिसत आहे. अजुनही वेळ गेलेली नाही, दलीतांनीच पुढाकार घेऊन डॉ. आंबेडकरांनी निर्माण केलेल्या समता सैनीक दल संघटनाला प्राधान्य द्यावे. 'गांव तेथे शाखा, घर तेथे सैनीक' हा मंत्र खरा करून दाखववा आणि संपुर्ण भारतात सर्व राजकीय बहुजन चळवळीचे संघटक एकत्र येऊन SSD च्या अधिपत्या खाली काम करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न प्रत्यक्षात आणावे. हीच खरी डॉ. आंबेडकरांच्या जयंतीला मानवंदना राहील.

प्रा. प्रज्ञानंद श्रीकृष्ण थोरात
(लेखक- पत्रकार व शिक्षक)
अकोला मो. ९८२२६६४४८७

# विहिरीच्या काठापासून संसदेच्या सभागृहापर्यंत भारताची स्त्री-प्रणीत शासन क्रांती

**दशकानुदशके, भारतीय सार्वजनिक जीवनातील महिलांचा सहभाग हा केवळ एक 'समाजकल्याणकारी प्रकल्प' किंवा एका वंचित गटाचा औपचारिक समावेश' याच दृष्टिकोनातून पाहिला गेला. मात्र, आजच्या समकालीन राजकीय पटलावर नजर टाकली तर एक क्रांतिकारी वास्तव समोर येते. आपण आज एका अशा 'नव्या भारतीय मतदार' वर्गाचा उदय पाहत आहोत, जिथे महिला केवळ मूक प्रेक्षक उरल्या नसून त्या राष्ट्रीय धोरणांच्या मुख्य शिल्पकार बनल्या आहेत. गावातील ग्रामपंचायतीच्या चावडीपासून ते संसदेच्या दालनांपर्यंत, भारतीय लोकशाहीचा केंद्रबिंदू आता खऱ्या अर्थाने बदलला आहे. हे परिवर्तन काही एकाएकी घडलेले नाही.**

पिढ्यानपिढ्या, लाखो महिला घरगुती गरजांच्या अदृश्य श्रमात जखडलेल्या होत्या - पाणी शेंदणे, सरपण गोळा करणे आणि पारंपरिक चुलींचे व्यवस्थापन करणे, यातच त्यांचे आयुष्य व्यतीत होत होते. ग्रामीण पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण करून, नळाद्वारे पाणीपुरवठा आणि स्वच्छ इंधनाची सोय केल्यामुळे, राज्याने महिलांच्या आयुष्यातील हजारो मोलाचे तास त्यांना परत मिळवून दिले आहेत. हा 'मुक्त झालेला वेळ' आता शिक्षण, उद्योजकता आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे राजकीय सहभागामध्ये गुंतवला जात आहे. या गुंतवणुकीचा पुरावा आपल्याला मतदानाच्या रांगेत स्पष्टपणे दिसतो. महिला मतदारांची संख्या आता पुरुषांच्या बरोबरीने किंवा कित्येकदा त्यांच्यापेक्षाही जास्त आहे. महिला आता केवळ कुटुंबाचा एक भाग म्हणून नव्हे, तर आपल्या नागरिकत्वाच्या हक्काचा हिशोब मागणारा एक सजग आणि स्वतंत्र व्होट बँक म्हणून समोर येत आहेत. या उत्क्रांतीचा पाया भारताच्या पंचायती राज संस्थांच्या यशामध्ये दडलेला आहे.

आज स्थानिक पातळीवर १४.५ लाखांहून अधिक निवडून आलेल्या महिला प्रतिनिधींसह भारत जगात आघाडीवर आहे - हे प्रमाण एकूण स्थानिक नेत्यांच्या ४६ टक्के इतके प्रचंड आहे. या 'स्थानिक प्रयोगशाळे'चा परिणाम आता आकड्यांमध्येही मोजता येतो. संशोधनानुसार, महिलांच्या नेतृत्वाखालील पंचायती अशा सार्वजनिक कामांमध्ये जास्त गुंतवणूक करतात ज्यामुळे घरातील कष्ट कमी होतील. महिला नेत्यांना एखादा नादुरुस्त हातपंप ही केवळ तांत्रिक समस्या वाटत नाही, तर ती मुलीच्या शिक्षणातील अडथळा वाटते. त्या शासनामध्ये असा एक अनुभवाधिष्ठित कार्यक्षमता आणतात, जी निव्वळ कागदी धोरणांपेक्षा मानवी भांडवलाला जास्त महत्त्व देते. 'नारी शक्ती वंदन अधिनियम' हा याच प्रवासाचा एक तर्कसंगत आणि अंतिम टप्पा आहे. लोकसभाआणि विधानसभांमध्ये ३३ टक्के आरक्षण वैधानिक करून भारत आता केवळ प्रतीकात्मक प्रतिनिधित्वाकडून खऱ्या समानतेकडे वाटचाल करत आहे. राष्ट्राची अर्धी लोकसंख्या त्यांच्या नेतृत्वक्षमतेसह मुख्य प्रवाहात नसल्यास, तो देश आपल्या पूर्ण क्षमतेने प्रगती करू शकत नाही, हेच यातून अधोरेखित होते.मात्र, या कायद्याने राष्ट्राचे खऱ्या अर्थाने परिवर्तन घडवायचे असेल, तर तो राजकीय गणितांच्या पलीकडे जाणे आवश्यक आहे. या मैलाच्या दगडाला मिळणारा पाठिंबा हा निश्चितपणे द्विपक्षीय (Bipartisan) असायला हवा. हा केवळ एका पक्षाचा विजय नसून तो एका संस्कृतीचा उत्कर्ष आहे. जेव्हा संसदेची द्वारे ३३ टक्के महिला प्रतिनिधींसाठी उघडली जातील, तेव्हा ते आपल्या लोकशाहीची 'सामूहिक प्रज्ञा' (National Intelligence) उन्नत करण्याचे प्रतीक असायला हवे.जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून भारताची एक अनोखी जबाबदारी आहे. अशा काळात, जिथे जागतिक स्तरावर लोकशाहीतील सहभागावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे, भारत हे दाखवून देत आहे की, उत्तर 'कमी लोकशाही'मध्ये नसून 'अधिक सर्वसमावेशक लोकशाही'मध्ये आहे. जेव्हा भारतासारखी महासत्ता एकसंध आणि स्त्री-पुरुष समानतेच्या आवाजात बोलते, तेव्हा उर्वरित जगाला ते ऐकण्याशिवाय पर्याय उरत नाही.

**स्मिता देशमुख**

# अब्राहम लिंकनचे हेडमास्तरांस पत्र!



सगळीच माणसे न्यायप्रिय नसतात, नसतात सगळीच सत्यनिष्ठ, हे शिकेलच माझा मुलगा कधी ना कधी. मात्र त्याला हेदेखील शिकवा की जगात प्रत्येक बदमाषागणिक असतो एक साधुचरित पुरुषोत्तमही. स्वार्थी राजकारणी असतात जगात, तसे असतात अवघं आयुष्य समर्पित करणारे नेतेही. असतात टपलेले वैरी तसे जपणारे मित्रही.

मला माहीत आहे, सगळ्या गोष्टी झटपट नाही शिकवता येत.. तरीही जमलं तर त्याच्या मनावर ठसवा, घाम गाळून कमावलेला एकच छदाम आयत्या मिळालेल्या घबाडापेक्षा मौल्यवान आहे.

हार कशी स्वीकारावी ते त्याला शिकवा आणि शिकवा विजयाचा आनंद संयमानं घ्यायला. तुमच्यात शक्ती असली तर त्याला द्वेषमत्सरापासून दूर राहायला शिकवा. शिकवा त्याला आपला हर्ष संयमानं व्यक्त करायला. गुंडांना भीत जाऊ नको म्हणावं, त्यांना नमवणं सर्वात सोपं असतं!

जमेल तेवढं दाखवीत चला त्याला ग्रंथभांडाराचं अद्भुत वैभव, मात्र त्याबरोबरच, मिळू दे त्याच्या मनाला निवांतपणा सृष्टीचं शाश्वत सौंदर्य अनुभवायला. पाहू दे त्याला पक्ष्यांची अस्मानभरारी सोनेरी उन्हात भिरभिरणारे भ्रमर.. आणि हिरव्यागार डोंगरउतारावर डुलणारी चिमुकली फुलं.

शाळेत त्याला हा धडा मिळू दे – फसवून मिळविलेल्या यशापेक्षा सरळ आलेलं अपयश श्रेयस्कर आहे.आपल्या कल्पना, आपले विचार यांच्यावर दृढ विश्वास ठेवायला हवा त्यानं, बेहेत्तर आहे सर्वांनी त्याला चूक ठरवलं तरी. त्यानं भल्यांशी भलाईनं वागावं आणि टग्यांना अद्दल घडवावी. माझ्या मुलाला हे पटवता आलं तर पहा- जिकडे सरशी तिकडे धावत सुटणाऱ्या भाऊगर्दीत सामील न होण्याची ताकद त्यानं कमवायला हवी. पुढे हेही सांगा त्याला की ऐकावं जनांचं, अगदी सर्वांचं पण गाळून घ्यावं ते सत्याच्या चाळणीतून आणि फोलपटे टाकून नितळ सत्त्व तेवढं स्वीकारावं.

त्याला हे पुरेपूर समजावं की करावी कमाई त्याने, ताकद आणि अक्कल विकून. पण कधीही विक्रय करू नये हृदयाचा आणि आत्म्याचा ! धिक्कार करणाऱ्यांच्या झुंडी आल्या तर कानाडोळा करायला शिकवा त्याला आणि ठसवा त्याच्या मनावर – जे सत्य आणि न्याय्य वाटतं त्याच्यासाठी पाय रोवून लढत राहा.

त्याला ममतेनं वागवा पण लाडावून ठेवू नका. आगीत तावूनसुलाखून निघाल्याशिवाय लोखंडाचं कणखर पोलाद होत नसतं. त्याच्या अंगी बाणवा अधीर व्हायचं धैर्य, अन् धरला पाहिजे धीर त्यानं जर गाजवायचं असेल शौय. आणखीही एक सांगत राहा त्याला- आपला दृढ विश्वास पाहिजे आपल्यावर, तरच जडेल उदात्त श्रद्धा मानवजातीवर.

माफ करा गुरुजी! मी फार बोलतो आहे,
खूप काही मागतो आहे
पण पहा, जमेल तेवढं अवश्य कराच.
माझा मुलगा -भलताच गोड छोकरा आहे हो तो!

**— अब्राहम लिंकन**

**महाराष्ट्र शासन**
**जलसंपदा विभाग**
**कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, अकोला**

**दुरध्वनी क्रमांक : ०७२१-२९९१४४९** **Email: mechdamt@gmail.com**

**ई निविदा सुचना क्रमांक - ०४ सन २०२६-२७**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, मांत्रिकी विभाग, अकोला जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून / संस्थांकडून खालील कामाकरिता बी-१ नमुन्यातील ई निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवत आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ, नागपूर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रूपये | इसारा रक्कम रूपये | सुरक्षा ठेव रूपये | काम पुर्ण करण्याचा कालावधी | काम पुर्ण करण्याची पात्रता | मुल्य रूपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | कार्यकारी अभियंता यांत्रिकी विभाग अकोला अंतर्गत द्वार निर्मिती व उभारणी उपविभाग क्र. १ अकोला करिता संथवाचे परीचलन देखभाल व सुरक्षेकरिता बाहय अभिकरणा मार्फता वाहनचालक, मदतनिस व किदार यांची सेवा पुरविण्याबाबत. | रु. २६,९३,७८१/- (GST वगळून) | रु. २६,९४०/- | रु. ५३,८८०/- | १२ महिने | या प्रकारच्या कामांचा पुर्वानुभव असलेल्या कंत्राटदाराकडुन / संस्थाकडून बी-१ निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा सादर करतांना कंत्राटदार जलसंपदा विभागाकडील यांत्रिकी संघटनेकडे पंजीकृत असणे आवश्यक नाही. | मुख्य निविदा कागदपत्रे २३६०/- (२००० +GST) |
| 2 | कार्यकारी अभियंता यांत्रिकी विभाग अकोला अंतर्गत व्दारे उभारणी व दुरुस्ती उपविभाग क्र.७ अकोला करिता संयवाचे परीचलन देखभाल व सुखोकरिता बाहय अभिकरणा मार्फत बयानचालक, मदतनिस य चौकिदार यांची सेवा पुरविण्याबाबत. | रु. ३२,७१,२३४/- (GST वगळून) | रु. ३२,७१५/- | रु. ६५४३०/- | १२ महिने | या प्रकारच्या कामांचा पूर्वानुभव असलेल्या कंत्राटदाराकडून / संस्थाकडून बी-१ निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा सादर करतांना कंत्राटदार जलसंपदा विभागाकडील यांत्रिको संघटनेकडे पंजीकृत असणे आवश्यक नाही. | मुख्य निविदा कागदपत्रे २३६०/- (२००० +GST) |

**ई निविदेचे वेळापत्रक**

१) ई निविदा प्रसिध्दीचा दिनांक व वेळ :- दि. ०५/०४/२०२६, सकाळी ११ वा
२) ई निविदा दस्ताऐवज डाउनलोड प्रारंभ व समाप्त दिनांक व वेळ :- दि.१५/०४/२०२६, सकाळी ११. या. पासून ते दि.२२/०४/२०२६ संध्याकाळी ०५.४५ पर्यंत
३) ई निविदा दाखल करण्याची सुरुवात व अंतिम दिनांक व वेळ :- दि १५/०४/२०१, सकाळी ११.०० वा. पासून ते दि २२/०४/२०२६ संध्याकाळी ०५.४५ पर्यंत
४) ई निविदा तांत्रिक देकार उघडण्याचे ठिकाण, दिनांक व वेळ :- दि. २४/०४/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. कार्यकारी अभियंता, यांत्रिको विभाग, अकोला यांचे कार्यालयात ऑनलाईन उघडण्यात येतील. (शक्य झाल्यास)

**नियम व अटी -**

१) कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयात नोटीस बोर्डावर सविस्तर नोटीस पहावयास मिळेल.
२) वरील निवेदेमधील कामाच्या करारनाम्यात पश्च्यात अहर्ता निकष समाविष्ठ आहेत.
३) संकेतस्थळावर प्रसिद्ध होणाऱ्या निविदा उघडण्याची तारीख व वेळेनुसार कंत्राटदाराने किवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधीने उपस्थित राहावे, अन्यथा निविदा उघडल्यानंतर कोणतीही तक्रार स्विकारली जाणार नाही.
४) खालिल ठिकाणी ई-निविदे बाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.
१) संकेतस्थळ www.mahaetenders.gov.in
(सदर निविदासुचने मध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईट वर कळविण्यात येईल.)


**(वि.ल. वराडे)**
**कार्यकारी अभियंता**
**यांत्रिकी विभाग, अकोला**

जिमाका/अम./जाहि./४८/२०२५-२०२६

## व्यक्ती विशेष

# आज जागतिक कला दिन

## लिओनार्डो दा विंची यांची जयंती



कलेची प्रशंसा केवळ तिच्या सौंदर्यात्मक गुणांसाठीच होत नाही, तर ती अभिव्यक्तीचे एक शक्तिशाली साधनही आहे. व्यक्तींना त्यांचे अद्वितीय दृष्टिकोन आणि ज्ञान अशा प्रकारे व्यक्त करण्याचे हे एक प्रभावी माध्यम आहे, जे भावी पिढ्यांना आकार देऊ शकते आणि त्यांच्याकडूनही आकार घेऊ शकते. परिणामी, सामूहिक जाणीव आणि कलाकृती यांच्यात थेट संबंध असतो. कलेच्या निर्मितीमागे नेहमीच एक हेतू असतो.

जगभरात सर्जनशीलता आणि सांस्कृतिक विविधतेला चालना देण्यात कलेचे महत्त्व आणि तिची भूमिका याबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी दरवर्षी १५ एप्रिल रोजी जागतिक कला दिन साजरा केला जातो. इतिहासातील महान कलाकारांपैकी एक मानल्या जाणाऱ्या लिओनार्डो दा विंची यांच्या जयंतीनिमित्त हा दिवस निवडण्यात आला.

युनेस्कोशी संलग्न असलेल्या इंटरनॅशनल असोसिएशन ऑफ आर्ट (IAA) या स्वयंसेवी संस्थेद्वारे पहिला जागतिक कला दिन २०१२ मध्ये साजरा करण्यात आला. कलाकार आणि सांस्कृतिक संस्था यांच्यातील आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि संवादाच्या वाढत्या गरजेला प्रतिसाद म्हणून IAA ची स्थापना १९५४ मध्ये झाली.



जागतिक कला दिनाचा मुख्य उद्देश लोकांना चित्रकला, शिल्पकला, संगीत, नृत्य, नाट्य, साहित्य आणि चित्रपट यांसारख्या विविध कला प्रकारांचे कौतुक करण्यास आणि त्यात सहभागी होण्यास प्रोत्साहित करणे हा आहे. तसेच, कला शिक्षणाचे महत्त्व आणि मुलांच्या व प्रौढांच्या विकासावर होणारा त्याचा सकारात्मक परिणाम अधोरेखित करण्याची ही एक संधी आहे.

कला हे एक गतिशील आणि सतत बदलणारे क्षेत्र आहे, ज्याच्या निर्मितीमागे वेगवेगळ्या प्रदेशांमध्ये आणि कालखंडांमध्ये विविध हेतू आणि प्रेरणा असतात. उदाहरणार्थ, युरोपातील प्रबोधनकाळात अभिजात ग्रीक ज्ञानामध्ये लोकांची रुची पुन्हा वाढली आणि कलाकारांनी व लेखकांनी जनसामान्यांना प्रेरणा देण्यासाठी आणि त्यांचे प्रबोधन करण्यासाठी चित्रकला व शिल्पकला यांसारख्या माध्यमांचा वापर केला. त्याचप्रमाणे, आफ्रिका आणि भारतातील वसाहतोत्तर लेखकांनी आणि कवींनी ब्रिटिश व फ्रेंच वसाहतवादाच्या अन्यायांवर प्रकाश टाकण्यासाठी साहित्याचा वापर केला. आशियामध्ये, अभिजात नृत्य प्रकार अनेकदा त्या-त्या प्रदेशांतील वैशिष्ट्यपूर्ण धार्मिक आणि आध्यात्मिक विषय सादर करतात.

विशेषतः भारताला प्राचीन गुहाचित्रांपासून ते समकालीन बॉलीवूड चित्रपटांपर्यंत पसरलेला एक समृद्ध सांस्कृतिक वारसा लाभला आहे. आपल्या देशाला सीमा, पिढ्या आणि काळाच्या पलीकडे जाणारा एक अद्वितीय, वैविध्यपूर्ण आणि सखोल आवाज देणाऱ्या कलेचे महत्त्व आपण साजरे केले पाहिजे. सरोजिनी नायडू यांच्या कवितेपासून ते केरळच्या भित्तिचित्रकलेपर्यंत आणि शास्त्रीय हिंदुस्तानी संगीतापर्यंत, भारतीय कला प्रकारांनी लोकांच्या जीवनाला सखोलपणे आकार दिला आहे आणि ते समृद्ध केले आहे. भारताला जगात एक सांस्कृतिक केंद्र म्हणून ओळख मिळवून देण्यात कलेने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. जागतिक कला दिन हा या कलाकृतींचा आणि त्यांच्या निर्मात्यांचा आदर करण्याचा एक छोटा पण अर्थपूर्ण उपक्रम आहे.

# न्यू लाइफ वेलनेस सेंटर मध्ये रक्तदानातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

प्रतिनिधी १५ एप्रिल

**अकोला :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त न्यू लाइफ वेलनेस सेंटर अकोला येथे भव्य रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. साई जीवन रक्तपेढी अकोला द्वारे डॉ. गुज्जलवार, हर्षा मेश्राम, पिंटू हिवराडे, निखिल चोपडे यांनी रक्त संक्रमण केले. सुरूवातीला डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रभाग १६ चे नगरसेवक विनोद मापारी होते. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त मार्गदर्शन केले तसेच रक्तदान शिबिराची प्रशंसा केली. प्रमुख अतिथी संजय सोनवणे वर्ल्ड टीम मेंबर, देवलाल सदाशिव वर्ल्ड टीम मेंबर, कांचन कुंमार सावळे होते. रक्तदान शिबिरामध्ये रक्तदान करणाऱ्यांत कांचन कुमार सावळे, राजेंद्र भगत, सुजित कुमार गोपनारायण, अरुण वाघ, रमेश वानखडे, देवयानी वाघ, प्रदीप कुमार गवई, अमर आडे, हर्षदा सरदार गोपनारायण, राजेश निखाडे, अरविंद शेगोकार, रूपाली गोपनारायण, सुजाता गोपनारायण यांचा समावेश होता. रक्तदात्यांचे न्यू लाइफ वेलनेस सेंटर तर्फे अभिनंदन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नागपुर महानगरपालिकेच्या उपायुक्त प्रगती सुनील जगताप मॅडम उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे संचालन दिलीप गोपनारायण आभार प्रदर्शन रूपाली गोपनारायण यांनी केले. संपूर्ण कार्यक्रम पार पाडण्यासाठी नितीन गोपनारायण सुपरवायझर आणि संपूर्ण वेलनेस टीमने सहकार्य केले.








# गॅससाठी नागरिकांची झुंबड; भर उन्हात तासनतास प्रतीक्षा

प्रतिनिधी १५ एप्रिल



**हातरूण :** येथे भारत गॅस एजन्सीसमोर गॅस सिलिंडरसाठी नागरिकांच्या लांब रांगा लागल्याचे चित्र आहे. एप्रिलच्या कडक उन्हात नागरिकांना तासनतास उभे राहून प्रतीक्षा करावी लागत असल्याने तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.


माहितीनुसार, अनेक नागरिक सकाळी ६ वाजल्यापासून अंदुरा कारंजा हाता बोरगाव वैराळे हाता हातरूण गाव मालवडा अनेक गावातुन रांगेत 'सकाळपासून उभे असल्याचे चित्र दिसून येत आहे.

या परिस्थितीमुळे महिला, ज्येष्ठ नागरिक आणि कामगार वर्गाला मोठा त्रास सहन करावा लागत आहे. उन्हाचा तडाखा आणि दीर्घ प्रतीक्षेमुळे अनेकांची प्रकृतीही बिघडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, एजन्सीकडून योग्य नियोजनाचा अभाव असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. टोकन प्रणाली, अतिरिक्त वितरण केंद्र किंवा ठराविक वेळापत्रक जाहीर न केल्याने गोंधळाचे वातावरण निर्माण झाल्याचेही नागरिकांचे म्हणणे आहे. एकीकडे सरकारकडून गॅसचा तुटवडा नसल्याचे सांगितले जात असताना, प्रत्यक्षात मात्र नागरिकांना अशा रांगा लावाव्या लागत असल्याने प्रशासनाच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

नागरिकांनी या प्रकरणाची तात्काळ दखल घेऊन गॅस वितरण प्रक्रिया सुरळीत करण्याची मागणी प्रशासनाकडे केली आहे. तसेच टोकन प्रणाली लागू करणे, अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध करून देणे आणि वेळापत्रक स्पष्ट जाहीर करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. या एजंसीवर मनमानी कारभार चालु असल्याची चर्चा आहे. तसेच आठ दिवसापासुन गावातील व बाहेर गावातील नागरिक सिलेंडर साठी चकरा मारत आहे. या मध्ये सुसूत्रता यावी अशी अपेक्षा आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी



प्रतिनिधी १५ एप्रिल

**कुटासा :** येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी विविध देखावे सादर करण्यात आले होते. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. गावातील प्रमुख मार्गाने मिरवणूक काढण्यात आली. गावातील भीम अनुयायी या मिरवणूकीत अतिशय उत्साहाने सहभागी झाले होते. मिरवणूक उत्साहात व शांततेत पार पडली. पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# अकोल्याच्या शिरपेचात मानाचा तुरा

**♦ अर्णव साठे करणार महाराष्ट्र क्रिकेट संघाचे नेतृत्व**

प्रतिनिधी १५ एप्रिल

**अकोला :** स्कूल गेम्स फेडरेशन ऑफ इंडियाच्या वतीने आयोजित राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेत अकोल्याच्या क्रीडा क्षेत्राने मोठी झेप घेतली आहे. तळागाळातील खेळाडूंना व्यासपीठ मिळवून देणाऱ्या या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत, अकोला जिमखाना क्रिकेट क्लबचा उदयोन्मुख खेळाडू अर्णव मोहन साठे याची महाराष्ट्र राज्याच्या अंडर-१७ (१७ वर्षांखालील) क्रिकेट संघाचे नेतृत्व करण्यासाठी निवड झाली आहे.



या राष्ट्रीय स्पर्धेच्या पूर्वतयारीसाठी महाराष्ट्र संघाचे विशेष प्रशिक्षण शिबिर (कॅम्प) २० एप्रिल २०२६ पासून लातूर येथे आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरानंतर मुख्य स्पर्धेचा थरार रंगणार आहे. २६ एप्रिल ते १ मे २०२६ या कालावधीत तेलंगणा राज्यातील महाबूबनगर येथील जाडचेरला मिनी स्टेडियमवर हे सामने खेळवले जातील. विशेष म्हणजे, या स्पर्धेत महाराष्ट्रासह देशभरातील एकूण ४५ जिल्ह्यांचे प्रतिनिधीत्व करणारे संघ सहभागी होणार आहेत. अर्णव साठे याने लहानपणापासूनच क्रिकेटचे बारकावे अकोल्यातील प्रसिद्ध रणजीपटू आणि व्ही.सी.ए. चे सहाय्यक प्रशिक्षक रवी ठाकूर यांच्याकडून आत्मसात केले आहेत.

रवी ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली अर्णवने आपल्या खेळात सातत्य राखले असून, त्याच्या या निवडीमुळे अकोला जिमखाना क्रिकेट क्लब आणि जिल्ह्याच्या क्रीडा वर्तुळात आनंदाचे वातावरण आहे.अर्णवच्या या यशाबद्दल त्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, आगामी राष्ट्रीय स्पर्धेसाठी त्याला शुभेच्छा देण्यात येत आहेत.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त अकोला अर्बन बँक कर्मचाऱ्यांचा उपक्रम

## अशोकवाटिकेत अभिवादन व कैरी पन्ह्याचे वाटप

प्रतिनिधी १५ एप्रिल

**अकोला :** डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त दि अकोला अर्बन बँक कर्मचा-यांच्या वतीने सामाजिक जाणीव आणि कृतज्ञता व्यक्त करणारा प्रेरणादायी कार्यक्रम उत्साहात पार पडला. शहरातील अशोक वाटिका येथे सकाळी आयोजित या कार्यक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या विचारांचे स्मरण करत समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांचा अंगीकार करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे वातावरण अत्यंत प्रेरणादायी व उत्साहपूर्ण होते.

यावेळी बँकेचे अध्यक्ष शंतनू जोशी, उपाध्यक्ष राहुल राठी, संचालक मंडळाचे सदस्य दीपक मायी, कैलासनाथ मशानकर, प्रमोद शिंदे यांच्यासह माजी अध्यक्ष बाबासाहेब पाठक, रामेश्वर फुंडकर तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी राजन सोनटक्के, श्रीहरी पाटील यांच्यासह बँक कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी एकत्र येऊन




समाजातील सर्व घटकांपर्यंत डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा प्रसार करण्याची गरज अधोरेखित केली. कार्यक्रमानंतर बँकेच्या आजी-माजी कर्मचाऱ्यांच्या पुढाकारातून अशोक वाटिका येथे येणाऱ्या सर्व नागरिकांना सकाळी १० ते रात्री १० वाजेपर्यंत कैरी पन्हे वाटप करण्यात आले. एप्रिल महिन्यातील वाढत्या उष्णतेच्या या उपक्रमाच्या यशस्वी करण्यासाठी बँकेचे आजी-माजी कर्मचारी दीपक शिरसाट, रामेश्वर पाखरे, महेश जोशी, संजूभाऊ तायडे, सारंग कऱ्हे, सुधाकर पळसपगार, संजय शर्मा, राजेश शर्मा, धनंजय जामनिक, सुधीर देशपांडे, मनोहर गवई, उदय थत्ते, भास्कर इंगळे, मनोज राऊत, समीर थोडगे, राजेश घनमोडे, रवी अग्रवाल, रमेश इंगळे, नीलकंठ वानखडे, विनोद पळसपगार, संजय घुले, शंकर कौसकर, सुनील शिरसाट, किशोर येळवणकर इ. ह्यांनी अथक परिश्रम घेतले. सर्वांनी या सेवाभावी उपक्रमाचे स्वागत केले.

# प्रभा प्रकाश कॉन्व्हेंटमध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी



प्रतिनिधी १५ एप्रिल

**आलेगाव:** स्थानिक प्रभा प्रकाश कॉन्व्हेंट येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने शाळेत विविध सांस्कृतिक व शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री महावीर जैन होते. तसेच परिवेक्षक श्री निलेश पस्तापुरे आणि चंदा मुर्तडकर यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनावर आधारित प्रेरणादायी भाषणे दिली व भीमगीते सादर केली. जयंतीनिमित्त आयोजित वक्तृत्व स्पर्धेत इयत्ता ५ वी ची विद्यार्थिनी कुमारी दिव्यांशी बसवानाथे हिने प्रथम क्रमांक पटकावला, तर निबंध स्पर्धेत कुमारी समीक्षा तेलगोटे हिने प्रथम क्रमांक मिळवून यश संपादन केले. कुमारी दिव्यांशी बसवानाथे हिने सादर केलेल्या सुंदर गीताने संपूर्ण वातावरण मंत्रमुग्ध झाले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुपाजी अंभोरे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार विनोद नाप्ते यांनी मानले. या प्रसंगी शाळेतील सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्वांनी विशेष परिश्रम घेतले.

# आंतरराष्ट्रीय ऑलंपियाड स्पर्धा परीक्षेत यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण



प्रतिनिधी १५ एप्रिल

**अकोला :** यंग मुस्लिम एज्युकेशन ॲड सोशल वेल फेअर सोसायटी पातुर व्दारा संचालीत सैयद मोहसीन उर्दु हरास्कुल शिवणी मध्ये ९ वी चे विधार्थ्याची अंतरराष्ट्रीय हिंदी ओलंपीयाड स्पर्धा परीक्षा घेण्यात आली या सपर्धा मध्ये सैयद मोहसीन उर्दु हरास्कुल जुनीयर कॉलेज शिवणी चे विधार्थ्यानी यश् मिळवला सर्पधा परीक्षा मध्ये विद्यार्थ्यांचा पुरसकार वित्रण् समारोह चा आयोजन करण्यात आला या कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्था सचिव सैयद अकबर अब्दुल्ला साहेबानी उततीर्ण विधार्थी मध्ये महेक परवीन शेख अकील सना अंजुम अब्दुल नइम अशमीरा सदफ नवेद परवेज अलफीयाअनम शेख जावेद फरीदा परवीन अबदुल हफीज फीरदोस परवीन फीरोज खान अलवीरातहरीन सैयद वसीम अलफया अंजुम शेख नासीर सना परवीन शेख इरफान शेख जिशान शेख सलाम मुजम्मील शाह वसीम शाह शेख जियान शेख राजीक (अंतर राष्ट्रीय गणीत आलंपीयाड ).

शेख दानीश शेख नाजीम अंतर राष्ट्रीय जनरल नालेज आलंपीयाड याना मॅडल व प्रमाणपत्र. देउन विधार्थाचे कौतुक केले शाळेतील मुख्याध्यापक सैयद मोहीब ईकबाल सर यानी मनोगत व्यक्त करतांना महटले आहे की सफलता फक्त इच्छा ने प्राप्त होत नाही सफलता करीता परीश्रम केल्याने सफलता प्राप्त होते या कार्यक्रमात यशस्वीते साठी शाळेतील सहायक शिक्षक असीमोद्दीन शमशेर खान मोहम्मद अनवारोदीन मोहममद जाहिद व शिक्षकेत्तर कर्मचारी परीश्रम घेतले

# डॉ.साजिद शेख यांची मुस्लिम वेलफेअर असोसिएशनच्या विदर्भ महासचिवपदी नियुक्ती

प्रतिनिधी १५ एप्रिल

**पातूर :** सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे तसेच 'शिक्षण क्रांतिकारी' म्हणून ओळखले जाणारे डॉ. साजिद शेख यांची मुस्लिम वेलफेअर असोसिएशनच्या विदर्भ महासचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे.



डॉ. शेख यांनी १५ ते २० वर्षांपासून शिक्षण व समाजसेवा क्षेत्रात भरीव योगदान दिले आहे. आयुर्वेद, होमिओपॅथी, नर्सिंग आणि फिजिओथेरपी या क्षेत्रातील विविध शैक्षणिक संस्थांमध्ये डायरेक्टर म्हणून कार्य करत आहेत.

त्यांच्या मार्गदर्शनाखाली आयुर्वेद महाविद्यालय, होमिओपॅथिक महाविद्यालय, नर्सिंग महाविद्यालय, फिजिओथेरपी महाविद्यालय तसेच परभणी येथील मेडिकल कॉलेजमध्ये ते डायरेक्टर म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थ्यांनी विविध व्यावसायिक क्षेत्रात यश संपादन केले आहे. याशिवाय ते अध्यक्ष – मानव परिवर्तन संस्था (पातूर, अकोला), अध्यक्ष – रुरल डेव्हलपमेंट फाउंडेशन (पातूर, अकोला) आणि सचिव – युनिक फाउंडेशन (औरंगाबाद) या पदांवरही कार्यरत असून, या संस्थांच्या माध्यमातून त्यांनी समाजाभिमुख उपक्रम राबवले आहेत. गरजू विद्यार्थ्यांना पॉलिटेक्निक, इंजिनिअरिंग, फार्मसी, आर्किटेक्चर व नर्सिंग शिक्षणासाठी मार्गदर्शन व मदत उपलब्ध करून देण्यात आली आहे. डॉ. साजिद शेख यांच्या कार्याची दखल घेत मुस्लिम वेलफेअर असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष सलीम सारंग यांनी त्यांना नियुक्तीपत्र प्रदान केले. या वेळी युवक आघाडीचे विदर्भ सचिव मोहम्मद फरहान अमीन व इतर मान्यवर उपस्थित होते.


# राजगृह नगरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

प्रतिनिधी १५ एप्रिल

**मुर्तीजापुर :** पंचशील मित्र मंडळ व सुजाता महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त स्थानिक डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यास अभिवादन करण्यात आले.

यावेळी सकाळच्या सत्रात मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी व नागरिकांनी मोठ्या उत्साहात एकत्र येत डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. कार्यक्रमाला उपस्थितांनी 'जय भीम' च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता.

या प्रसंगी आ. हरीश पिंपळे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे महत्त्व



सांगत, समाजातील समानता, बंधुता आणि शिक्षण यांचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी सांगितले की, डॉ. आंबेडकर यांनी दिलेल्या मूल्यांचा स्वीकार करून समाज प्रगतीच्या दिशेने वाटचाल करू शकतो. कार्यक्रमाचे नियोजन नगरसेवक संदीप सरनाईक नगरसेविका शुभांगी सरनाईक यांनी केले कार्यक्रमात महिलांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. सुजाता महिला मंडळाच्या सदस्यांनी सक्रिय सहभाग नोंदवत कार्यक्रम यशस्वी करण्यात मोलाची भूमिका बजावली. मूर्तिजापुरात प्रथमच सातारा येथील विघ्नहर्ता लॉईडली साऊंड डीजेच्या तालावर मुर्तीजापुर कर नाचले .यावेळी नगराध्यक्ष हर्शल साबळे, उपनगराध्यक्ष रोहीत अव्वलवार, नगरसेवक सचिन देशमुख, गजानन नाकट,बंटी पिंपळे, भारत जेठवानी पंकज कांबे, लखन अरोरा राहुल पाटील, इब्राहिम घाणीवाला निलेश वानखडे,रवी माडकर, कैलास महाजन,लखन ,राम खंडारे, शेवटी सर्व उपस्थितांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर चालण्याचा संकल्प केला. कार्यक्रम शांततेत व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार अन्वर खान यांनी केले कार्यक्रम यशस्वीतेसाठी पत्रकार विशाल नाईक, मोहन बोरखडे, विकी बोरकर ,रमेश थोरात ,संतोष खंडारे, राहुल थोरात, दीपक गायकवाड ,राहुल इंगळे, गणेश पाढेन आदींनी परिश्रम घेतले पोलीस निरीक्षक अजित जाधव यांनी चौक बंदोबस्त दिला



सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
बुधवार, दि. १५ एप्रिल २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

# अंगणवाड्यांची दयनीय अवस्था

## २६ केंद्रांमध्ये मूलभूत सुविधांचा अभाव; बालकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर

प्रतिनिधी १५ एप्रिल



**आर्णी :** शहरातील अंगणवाड्यांमध्ये वीज, पाणी, स्वच्छता आणि रस्त्यांसारख्या मूलभूत सुविधांचा गंभीर अभाव असल्याने बालकांच्या आरोग्यावर धोका निर्माण झाला आहे. या समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी नगरसेविका डॉ. नाहिद आरिज बेग यांनी आर्णी नगरपरिषद प्रशासनाकडे निवेदन सादर केले.

शहरातील २६ अंगणवाड्यांपैकी तब्बल १८ केंद्रांमध्ये वीज जोडणीच नाही. त्यामुळे पंखे, लाईट यांसारख्या आवश्यक सुविधा उपलब्ध नाहीत. तसेच अनेक ठिकाणी शौचालय व स्नानगृहांची सोय नसल्याने बालकांसह सेविकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

अंगणवाडीकडे जाणारे रस्तेही अत्यंत खराब अवस्थेत असून पावसाळ्यात नाल्याचे सांडपाणी परिसरात साचते.

यामुळे संसर्गजन्य आजारांचा धोका वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. याशिवाय हँडपंपमधून येणारे पाणी दूषित असल्याने स्वच्छ पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न निर्माण झाला आहे.

आर्णी नगरपरिषद क्षेत्रात कार्यरत २६ अंगणवाड्यांमधून तीन वर्षांवरील ११९८ बालकांना लाभ दिला जातो. शून्य ते तीन वर्ष वयोगटातील बालकांच्या संगोपनातही या केंद्रांची महत्त्वपूर्ण भूमिका आहे.

दरम्यान, डॉ. नाहिद आरिज बेग यांनी मानवता मंदिर परिसरातील अंगणवाडीत सेविकांची बैठक घेऊन प्रत्यक्ष समस्यांची माहिती घेतली. ग्रामीण भागातील अंगणवाड्यांच्या तुलनेत शहरातील केंद्रांची अवस्था चिंताजनक असल्याचे त्यांनी नमूद केले.

काही अंगणवाड्यांमध्ये तातडीने स्वच्छता करण्यात आली असली तरी उर्वरित केंद्रांमध्येही आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. बालकांच्या हितासाठी प्रशासनाने तात्काळ उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात येत आहे.

## मोहदा येथे शुक्रवारी 'महाराजस्व समाधान शिबिर' अभियान

प्रतिनिधी १५ एप्रिल

**यवतमाळ :** मोहदा येथील हिंदुस्थानी मंगलम् सभागृहात शुक्रवार, १७ एप्रिल रोजी 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर' सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराच्या माध्यमातून नागरिकांना विविध शासकीय सेवा एकाच ठिकाणी, सुलभ आणि जलद पद्धतीने उपलब्ध करून देण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे.

या शिबिरात पंचायत समिती, आरोग्य विभाग, वनविभाग, भूमी अभिलेख तसेच बँक आदी विभागांचा सहभाग राहणार आहे. नागरिकांच्या प्रलंबित फेरफार प्रकरणांचा निपटारा, सातबाऱ्यातील चुका दुरुस्ती, डिजिटल स्वाक्षरीचे सातबारा व ८-अ उताऱ्यांचे वाटप करण्यात येणार आहे. तसेच उत्पन्न, रहिवासी, जात व नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्रांसह विद्यार्थ्यांसाठी आवश्यक दाखलेही तत्काळ देण्यात येणार आहेत.

याशिवाय अकृषक तरतुदींबाबत मार्गदर्शन, नवीन व्यवस्थापन सनद प्रक्रियेची माहिती, तुकडेबंदी उल्लंघन प्रकरणांचा निपटारा तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ नागरिकांना दिला जाणार आहे. या शिबिराचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन मंडळ अधिकारी प्रशांत घरडे यांनी केले असून, आयोजनासाठी संबंधित विभागांकडून तयारी पूर्णत्वाकडे आली आहे.

# लोणी येथे आंबेडकर जयंतीनिमित्त पाणपोईचा शुभारंभ

## उन्हाळ्यात प्रवाशांना दिलासा; विविध कार्यक्रमांचेही आयोजन




प्रतिनिधी १५ एप्रिल



■ "समाजसेवेच्या या छोट्याशा प्रयत्नातून मानवतेची सेवा करण्याचा आमचा संकल्प आहे. तहानलेल्या ओठांना पाणी देणे हीच खरी सेवा."
- नीताताई राजेश आडे, अध्यक्ष, गणपती संस्थान

**आर्णी :** आर्णी तालुक्यातील लोणी येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त बसस्थानक परिसरात पाणपोईचा शुभारंभ करण्यात आला. वाढत्या उन्हाच्या पार्श्वभूमीवर प्रवासी व नागरिकांना थंड पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

१४ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता हा लोकार्पण सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी गावातील नागरिक, प्रवासी तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. उद्घाटनानंतर उपस्थितांसाठी अल्पहाराची व्यवस्था करण्यात आली होती.

कडक उन्हाळ्यात प्रवास करणाऱ्या नागरिकांना पिण्याच्या पाण्याची मोठी अडचण भासते. अनेकदा पाणी खरेदी करावे लागत असल्याने आर्थिक भारही वाढतो. ही बाब लक्षात घेऊन नीताताई राजेश आडे (अध्यक्ष, गणपती संस्थान) व राजेश आडे (कामगार उपायुक्त, मुंबई) यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. विशेष म्हणजे, मागील वर्षीही याच ठिकाणी पाणपोई सुरू करण्यात आली होती.

या उपक्रमात अमित रामटेके, वसंतराव खारोळ (माजी सरपंच), संजय वारंगे, प्रवीण गायधने, मनोज नानापुरे, सुरज काळे, योगेश चौधरी, नंदू काळे, अविनाश डाकुलकर, गोपाल कोटमकार, सचिन धाये, रमेश काळे, सुनील आडे, यशवंत मसारकर यांच्यासह नवयुवक पंचशील मंडळ, लोणीचे सदस्य सहभागी झाले होते.

दरम्यान, रामनवमीच्या दिवशी जवळा येथेही पाणपोई सुरू करण्यात आली होती. समाजातील गरजूंना मदत करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. जयंतीनिमित्त नवयुवक पंचशील मंडळातर्फे विविध कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले.

# सूतगिरणीच्या सुतापासून बनवलेल्या हाराने डॉ.आंबेडकरांना अभिवादन

प्रतिनिधी १५ एप्रिल



**यवतमाळ :** रामदास आठवले मागासवर्गीय सहकारी सूतगिरणीच्या वतीने महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अनोख्या पद्धतीने अभिवादन करण्यात आले. सूतगिरणीमध्ये तयार करण्यात आलेल्या सुतापासून बनवलेल्या हाराचे अर्पण करून अध्यक्ष महेंद्र मानकर यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

यावेळी मानकर यांनी सांगितले की, सूतगिरणी ही केवळ उत्पादनाची जागा नसून समाजाच्या प्रगतीशी निगडित एक महत्त्वाचा घटक आहे. डॉ. आंबेडकर यांच्या विचारांमुळेच मागासवर्गीय समाजाला नवी दिशा मिळाली असून, त्यांच्या कार्याप्रती आदर व्यक्त करण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमामुळे स्थानिक उद्योग आणि सामाजिक बांधिलकी यांचा संगम साधण्याचा प्रयत्न करण्यात आला असून, कामगारांमध्येही उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# यवतमाळात समता सैनिक दलाच्या वतीने अभिवादन रॅली

प्रतिनिधी १५ एप्रिल



**यवतमाळ :** दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया (भारतीय बौद्ध महासभा) व समता सैनिक दलाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त १४ एप्रिल २०२६ रोजी आयोजित समता सैनिक दलाची अभिवादन रॅली मोठ्या उत्साहात आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडली.

सकाळी ७.३० वाजता नेताजी नगर येथील चंद्रमणी बुद्ध विहार परिसरातून रॅलीला प्रारंभ झाला. समता सैनिक दलाच्या मार्चसह निघालेल्या या धम्मरॅलीत महिला-पुरुष, युवक-युवती, बौद्धाचार्य, उपासक-उपासिका तसेच समाजातील विविध घटक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. "जय भीम"च्या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

रॅलीने कृष्णकुंज सोसायटी, वडगाव परिसर, नागभूमी बुद्ध विहार, दांडेकर लेआऊट येथील शांतीदूत बुद्ध विहार, उमरसरा तीन फोटो चौक मार्गे पुढे जात शिवाजी गार्डन आर्णी रोडने संविधान चौक गाठले. येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यानंतर रॅली विदर्भ हाऊसिंग सोसायटीतील महाबोधी बुद्ध विहार, प्रभात नगर, भोसा येथील यशोधरा बुद्ध विहार, पाटीपूरा येथील डॉ. आंबेडकर चौक, तसेच पिंपळगाव येथील नालंदा बुद्ध विहार मार्गे पुढे सरकत शंकर नगर येथील बोधिसत्व बुद्ध विहार येथे पोहोचली.

सुमारे ११ वाजता रॅलीचा समारोप करण्यात आला. या वेळी उपस्थितांनी सामाजिक समता, बंधुता आणि बौद्ध धम्माच्या विचारांचा प्रसार करण्याचा संकल्प केला. कार्यक्रमाचे आयोजन दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया जिल्हा शाखा यवतमाळ महिला व पुरुष तसेच संरक्षण विभागाच्या वतीने करण्यात आले होते. रॅलीत सहभागी झालेल्या नागरिकांनी डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा वारसा जपण्याचा निर्धार व्यक्त केला.



■ यवतमाळ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त पाटीपुरा येथून भव्य बाईक रॅली काढण्यात आली. युवकांच्या उत्स्फूर्त सहभागाने "जय भीम"च्या घोषणांनी परिसर दणाणला. रॅलीतून सामाजिक समता, बंधुता आणि संविधानाच्या मूल्यांचा संदेश देण्यात आला.

# कृषी महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती

प्रतिनिधी १५ एप्रिल




**उमरखेड :** स्थानिक कृषी महाविद्यालय, उमरखेड येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली. महाविद्यालयाच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात महामानवाच्या विचारांना उजाळा देत विद्यार्थ्यांना सामाजिक बांधिलकीची जाणीव करून देण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सचिन चिंतले होते. प्रमुख पाहुणे म्हणून योगेश वाकडे, अनिल इंगळे, डॉ. सुनील पवार आणि किशोर आगे यांची उपस्थिती लाभली. यावेळी मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

प्रास्ताविकानंतर मान्यवरांनी आपल्या मनोगतातून डॉ. आंबेडकर यांच्या शैक्षणिक, सामाजिक तसेच कृषी क्षेत्रातील योगदानावर प्रकाश टाकला. "शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे" हा त्यांचा विचार विद्यार्थ्यांनी आत्मसात करून ज्ञानाच्या बळावर प्रगती साधावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाचे विजय शिंदे, तुषार चव्हाण व त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या नियोजनामुळे संपूर्ण कार्यक्रम शिस्तबद्ध आणि प्रभावीपणे पार पडला.

या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सामूहिक बुद्धवंदना आणि बाबासाहेबांच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांचे आभार मानून सोहळ्याची सांगता करण्यात आली.

# श्री उत्तमश्लोक वाङ:मय मंडळ वाचनालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती

प्रतिनिधी १५ एप्रिल



**उमरखेड :** येथील श्री उत्तमश्लोक वाङ:मय मंडळ वाचनालयाच्या वतीने भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 135 वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी उपस्थित वाचक आणि सदस्यांनी महामानवास विनम्र अभिवादन केले.

कमलकिशोर जयस्वाल: यांनी डॉ. बाबासाहेबांच्या सामाजिक समतेच्या विचारांवर प्रकाश टाकला.

राजाभाऊ गायकवाड: यांनी साने गुरुजी वाचन मंदिराच्या वतीने बोलताना संविधानामुळे मिळालेल्या लोकशाही मूल्यांचे महत्त्व सांगितले.

अभय पांडे यांनी डॉ. बाबासाहेबांच्या 'वाचाल तर वाचाल' या मूलमंत्राचा संदर्भ देत विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाचे महत्त्व विशद केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रसाद संस्थानिक यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात "शिक्षणातूनच मुक्तीचा मार्ग" या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. डॉ. बाबासाहेबांनी दिलेला 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा संदेश आजही तितकाच प्रासंगिक असून, केवळ शिक्षणच माणसाला गुलामगिरीतून आणि अज्ञानातून मुक्त करू शकते, असे प्रतिपादन त्यांनी आपल्या भाषणातून केले. वाचनालयाचे अध्यक्ष बाळासाहेब देशपांडे यांनी कार्यक्रमाचे नेटके नियोजन केले. याप्रसंगी पत्रकार स्वप्नील मगरे तसेच वाचनालयाचे सर्व सदस्य आणि वाचक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार रमेश भागवत यांनी मानले.

# रफीक कनोजे यांना 'म. बा. मेश्राम पत्रकारिता पुरस्कार'

प्रतिनिधी १५ एप्रिल



**झरी जामणी :** क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि राष्ट्रनिर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित 'समता पर्व २०२६' अंतर्गत मुकूटबन (ता. झरी जामणी) येथील पत्रकार रफीक कनोजे यांना 'म. बा. मेश्राम पत्रकारिता पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

समता पर्व प्रतिष्ठान, यवतमाळ यांच्या वतीने हा सन्मान देण्यात आला.

१३ एप्रिल रोजी सायंकाळी समता मैदान येथे पार पडलेल्या विशेष समारंभात ज्येष्ठ आंबेडकरी विचारवंत ज. वि. पवार यांच्या हस्ते कनोजे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

गेल्या २२ वर्षांपासून 'समता पर्व'च्या माध्यमातून सामाजिक प्रबोधन, सांस्कृतिक जतन आणि समतेचा संदेश व्यापक स्तरावर पोहोचवण्याचे कार्य सातत्याने केले जात आहे. यावर्षी ७ ते १३ एप्रिल या कालावधीत व्याख्याने, लोकधारा, महानाट्य, 'यवतमाळ आयडल', अभिनय स्पर्धा आदी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

महादेव बालाराम मेश्राम यांनी १९६२ मध्ये सुरू केलेल्या पत्रकारितेच्या परंपरेला उजाळा देण्यासाठी हा पुरस्कार दिला जातो.

सिटी न्यूज अमरावती
बुधवार, दि.१५ एप्रिल २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## भक्ती संगीताच्या कार्यक्रमाने श्रोते मंत्रमुग्ध झाले

**अमरावती :** स्थानिक आझाद हिंद मंडळ बुधवारा अमरावती च्या वतीने श्री हनुमान जन्मोत्सव निम्मित आयोजित भक्ती संगीताच्या कार्यक्रमात विदर्भातील प्रसिद्ध गायक आशुतोष देशपांडे व मधुसदन वटक यांनी सादर केलेल्या गीत रामायणातील काही गीते, तसेच अनेक लोकप्रिय भावगीत भक्तीगीतानी तर निवेदक प्रा. मोहन काटे यांचे वैशिष्ट्य पूर्ण निवेदन तसेच प्रसिद्ध तबला वादक श्री मुकुंद सराफ यांची युवा सहकारी सारंग केतकर यांची लाभलेली साथ या मुळे उपस्थित रसिक श्रोत्यांना २.३० तास मंत्रमुग्ध केले.तत्पूर्वी सर्व कलावंताचे स्वागत मंडळाचे सदस्य राजाभाऊ माजलगावकर, किशोर कलोती, अजित वडवेकर, डॉ. प्रा. आकाश मोरे, वेदांत डांगे यांनी केले. तर कलावंताचा परिचय डॉ. किशोर फुले यांनी करून दिला. सर्व कलावंताचा यथोचित सत्कार श्री ज्ञानेश्वर हिवसे यांनी केला.

# जिल्हा परिषद कार्यालय परिसरात बेशिस्तीचा कारभार

## पार्किंग गोंधळामुळे नागरिक त्रस्त, प्रशासन कधी जागे होणार?

प्रतिनिधी १५ जानेवारी



**अमरावती :** शहरातील जिल्हा परिषद कार्यालयासह विविध शासकीय कार्यालयांच्या परिसरात सध्या बेशिस्त पार्किंग व्यवस्थेचे गंभीर चित्र पाहायला मिळत असून, यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. दररोज शेकडो नागरिक विविध कामांसाठी या कार्यालयांमध्ये येत असतात. त्यातच कामकाजाच्या वेळेत विविध संघटना व गटांचे मोर्चे, निवेदने आणि बैठका यांमुळे परिसरात मोठी गर्दी निर्माण होत आहे. कार्यालय परिसरात अधिकृत पार्किंग व्यवस्था उपलब्ध असतानाही अनेक वाहनधारक नो -पार्किंग क्षेत्रातच आपली वाहने उभी करत असल्याचे चित्र समोर येत आहे. परिणामी, इतर नागरिकांना आपली वाहने बाहेर काढताना मोठी कसरत करावी लागत असून, अनेकदा वाहतूक कोंडीची परिस्थिती निर्माण होते. या गोंधळामुळे नागरिकांमध्ये संतापाची भावना वाढीस लागली आहे. विशेष म्हणजे, जिल्हा परिषद कार्यालयासह इतर शासकीय विभागांच्या परिसरातही अशीच बेशिस्त स्थिती दिसून येत असल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. नुकतीच सत्यम गांधी यांची अमरावती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नवीन (र्ष्ढिं) रुजू झाले असले तरी ते या गंभीर समस्येकडे लक्ष देतील का असा प्रश्न अमरावतीकरांचा आहे. कुठेही वाहने उभे केले जात असल्यामुळे केवळ नागरिकच नव्हे, तर कार्यालयीन कर्मचाऱ्यांनाही अडचणींचा सामना करावा लागत आहे. वेळेवर कार्यालयात पोहोचणे, वाहन पार्क करणे किंवा बाहेर काढणे यासाठी मोठा वेळ खर्च होत असल्याने कामकाजावरही परिणाम होत आहे.

नागरिकांकडून प्रशासनाला स्पष्ट मागणी करण्यात येत आहे की, पार्किंग व्यवस्थेवर कडक नियंत्रण ठेवण्यात यावे, नो पार्किंगमध्ये वाहन उभे करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी तसेच शिस्तबद्ध व नियोजित पार्किंग व्यवस्था उभारावी. आवश्यक असल्यास सुरक्षा रक्षकांची नियुक्ती व सीसीटीव्ही नियंत्रण वाढवावे, अशी मागणी होत आहे. जिल्हा परिषद व इतर शासकीय कार्यालय वाढती गर्दी आणि पार्किंगचा गोंधळ लक्षात घेता प्रशासनाने तातडीने ठोस उपाययोजना करून शिस्त प्रस्थापित करणे अत्यावश्यक झाले आहे.

## विभागीय आयुक्तालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन



प्रतिनिधी १५ जानेवारी

**अमरावती :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आज विभागीय आयुक्त कार्यालयात अपर आयुक्त सुरज वाघमारे यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.यावेळी उपस्थित अप्पर आयुक्त संजय जाधव सहाय्यक आयुक्त वैशाली पाथरे, श्री.कंदेवार, नायब तहसीलदार श्यामसुंदर देशमुख, उदय काळे, नाझर शरद लोणारे, विकास चव्हाण, सनत उईके, दिगंबर खंडगौरे तसेच अधिकारी कर्मचारी यांनी डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

## हत्येचा कट रचल्याचा आरोप ; बच्चू कडू यांना अटकपूर्व जामीन

प्रतिनिधी १५ एप्रिल



**अमरावती :** भाजपचे आमदार प्रवीण तायडे यांचे चुलत बंधू अभिजित तायडे यांना रस्ता अपघातात ठार मारण्याचा कट रचल्याच्या गंभीर आरोपात अतिरिक्त सत्र न्यायालयाने माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांना अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे.

त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यावर असलेली अटकेची टांगती तलवार तूर्तास टळली आहे. तायडे बंधूंनी चांदूर बाजार पोलिस ठाण्यात बच्चू कडू यांच्याविरोधात तक्रार दाखल केली होती. कडू यांच्या कुरळपूर्णा येथील निवासस्थानी अभिजित तायडे यांच्या हत्येचा कट रचला गेल्याचा खळबळजनक दावा त्यांनी केला होता. पुराव्यासाठी एक ऑडिओ क्लिपही सादर करण्यात आली होती. या क्लिपच्या आधारे पोलिसांनी कडू यांच्यावर गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल केले होते. याप्रकरणी ॲड. महेश देशमुख यांनी बच्चू कडू यांच्यावतीने अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता. अचलपूर अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयात दोन्ही बाजूंनी युक्तिवाद झाला. ऑडिओ क्लिपची सत्यता फॉरेन्सिक तपासणीनंतरच स्पष्ट होईल, ही बाब लक्षात घेऊन न्यायमूर्ती सागर पाटील यांनी कडू यांचा जामीन मंजूर केला.

## संविधान म्हणजे फक्त कलमे नाहीत तर ते आपल्या सगळयांच्या आयुष्याचे संरक्षण कवच आहे -आमदार सुलभाताई खोडके

प्रतिनिधी १५ जानेवारी



**अमरावती :** आजच्या काळामध्ये आपल्या भारत देशाला पुढे जाण्यासाठी सर्वाधिक आवश्यकता कशाची असेल तर ती म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारदृष्टीची आवश्यकता ही होय आपला भारत देश डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या विचारधनाच्या व त्यांनी प्रदान केलेल्या विचारदृष्टीच्या आधारेच खऱ्या अर्थाने पुढे जाऊ शकतो. एकाच वेळेस या देशातील सगळ्या समाजसमूहांना पुढे आणणे व सगळ्या समाजसमूहांतील व्यक्तींना विकसित होण्यासाठी त्यांला संधी उपलब्ध करणे हा त्यांच्या व्यक्तिमत्वाचा महत्वपूर्ण पैलू राहिला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना संपूर्ण भारताला उन्नत करायचे होते.या देशामध्ये जे काही शोषित, पीडित, उपेक्षित, वंचित समाजसमूह आहेत, त्या सर्व शोषित, पीडित, वंचित समाज समूहांच्या प्रश्नांना समजून घेणे आणि त्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करणे, ही भूमिका या सामाजिक कार्यामध्ये गृहीत होती. संघर्ष करण्याआधी ' शिका 'असा संदेश देणाऱ्या डॉ. आंबेडकरांनी आपल्या समाजाला सबळ, संघटित, स्वतंत्रता, सन्मान शिक्षणाने मिळविण्याच्या मार्गाचा आदर्श घालून दिला. भारताच्या घटनेचा मसुदा बनवितांना खऱ्या अर्थाने लोकशाही, समता, स्वातंत्र्य, कोणत्याही पिळवणूकीपासून मुक्तता या मूल्यांची जोपासना होईल यावर भर दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आयुष्य म्हणजे एका प्रकारे भारतीय समाजव्यवस्थेत प्रगतिशील परिवर्तनाची महान चळवळ होती. शिक्षणाला त्यांनी केवळ वैयक्तिक उन्नतीचे साधन मानले नाही, तर ते सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी अस्त्र बनवले. असे प्रतिपादन आमदार सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी उपस्थितांना संबोधून केले. मंगळवार दिनांक १४ एप्रिल २०२६ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्याने अमरावती रेल्वे स्टेशन चौक ते मध्यवर्ती बस स्थानक मार्ग परिसर स्थित जनसंपर्क कार्यालयात आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या.जगातील सर्वोत्कृष्ठ संविधान भारताला प्रदान करणारे महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त सर्वप्रथम आमदार - सौ. सुलभाताई खोडके व आमदार - संजय खोडके यांनी विश्वरत्न बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करीत त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन केले.

## कौटुंबिक वादातून मुलाकडून पित्याची हत्या

प्रतिनिधी १५ एप्रिल



**अमरावती :** दारू आणि गांजाच्या व्यसनातून घरात सतत होणाऱ्या वादाचे पर्यावसान वडिलांच्या खुनात झाले. नजीकच्या रेवसा येथे एका १९ वर्षीय मुलाने आपल्या वडिलांची लाकडी दांडक्याने डोक्यावर वार करून हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी शहर गुन्हे शाखेने तत्परता दाखवत अवघ्या चार तासांच्या आत आरोपी मुलाला ताब्यात घेतले आहे. जनार्दन श्रीरामजी केवदे (वय ५२, रा. रेवसा) असे मृताचे नाव आहे. तर धीरज जनार्दन केवदे (वय १८) असे आरोपी धिरज अटक आरोपीचे नाव आहे.

जनार्दन केवदे यांना दारू आणि गांजाचे व्यसन होते. या व्यसनामुळे ते सतत घरात पत्नी आणि मुलाला शिवीगाळ व मारहाण करत असत. १२ एप्रिल रोजी मध्यरात्रीच्या सुमारास जनार्दन हे नशेच्या धुंदीत घरी आले आणि पुन्हा वाद घालू लागले. त्यांच्या रोजच्या या जाचाला कंटाळून धीरज याने रागाच्या भरात लाकडी दांडक्याने वडिलांच्या डोक्यावर प्रहार केला, ज्यामध्ये त्यांचा जागीच मृत्यू झाला. तत्पूर्वी जनार्दन यांनी दारू पिऊन घरी प्रवेश करताच वीजपुरवठा बंद केला.

## थिलोरीत 'वैचारिक जयंती' उत्साहात; विद्यार्थ्यांचा गौरव

प्रतिनिधी १५ जानेवारी

**थिलोरी:** महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व सम्राट अशोक यांच्या जयंतीनिमित्त आयोजित 'वैचारिक जयंती' उपक्रम थिलोरी येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या उपक्रमाअंतर्गत स्पर्धा परीक्षा आयोजित करण्यात आली होती. महात्मा फुले यांच्या जयंतीदिनी (दि. ११) परीक्षा घेण्यात आली, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीदिनी बक्षीस वितरण सोहळा संपन्न झाला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे झालेल्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांसह खुल्या गटातील नागरिकांचा सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व रोख पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या पूजनाने करण्यात आली. तसेच कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य करणाऱ्या व्यक्तींचाही सन्मान करण्यात आला.स्पर्धेत संगीता चौरपगार यांनी प्रथम क्रमांक पटकावत १००० रुपयांचे पारितोषिक मिळवले. रत्नमाला नेतनराव यांनी द्वितीय क्रमांकासह ६०० रुपये, तर रोहित टापरे यांनी तृतीय क्रमांकासह ५०० रुपयांचे पारितोषिक पटकावले. विजेत्यांना प्रशासक मीनाताई धर्माळे, ग्रामपंचायत अधिकारी पी. एन. चारथड व तंटामुक्ती अध्यक्ष सेवानंद वाकपांजर यांच्या हस्ते विशेष प्रावीण्य प्रमाणपत्र व रोख पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच सर्व सहभागी स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले.

कार्यक्रमासाठी दिव्यांक होले, प्रमोद पाटील होले व अनिल पाटील होले यांचे विशेष सहकार्य लाभले.

यावेळी इंजी. अनिकेत वाकपांजर यांनी आपल्या मनोगतात, 'महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या समता व शिक्षणाच्या विचारांची अंमलबजावणी केवळ बोलण्यात नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीतून करणे ही काळाची गरज आहे,' असे प्रतिपादन केले.

लोकमान्य बहुद्देशीय संस्था व नागरिक हक्क संरक्षण समिती, थिलोरी यांच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इंजी. अनिकेत वाकपांजर यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. अनिरुद्ध पाटील होले यांनी केले.

## पवन नगर बडनेरा येथे भीषण आग

### अग्निशमन दलाच्या तत्परतेने मोठा अनर्थ टळला

प्रतिनिधी १५ जानेवारी

**अमरावती :** १४ एप्रिल रोजी दुपारी ०१:३५ वाजता पवन नगर बडनेरा येथे एका घराला भीषण आग लागल्याची घटना घडली.

या घटनेची माहिती केंद्रप्रमुख गजभारे यांनी दूरध्वनीद्वारे दिली. माहिती मिळताच केंद्रप्रमुख गजभारे यांच्या आदेशानुसार अग्निशमन दल तात्काळ घटनास्थळाकडे रवाना झाले.



अग्निशामक दलाचा बंब घेऊन कर्मचारी घटनास्थळी पोहोचले. आग लागलेले घर तसेच आसपासच्या खुल्या भूखंडातही आग पसरली होती. आगीचे स्वरूप अत्यंत भीषण असल्याने परिस्थिती नियंत्रणात आणणे आव्हानात्मक ठरत होते. मात्र, अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी धैर्य आणि तत्परता दाखवत आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी अथक प्रयत्न सुरू ठेवले. सुमारे १ ते १.३० तासांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांनंतर अखेर आगीवर पूर्णतः नियंत्रण मिळवण्यात यश आले.

# महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

प्रतिनिधी १५ जानेवारी

**अमरावती :** महामानव विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आ.रवि राणा व भाजपा नेत्या माजी खा.नवनित राणा यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक (इर्विन चौक) येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला हारार्पण करुन केले विनम्र अभिवादन केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक (इर्विन चौक) येथे भाजपा नेत्या माजी .खा.नवनित राणा व आ.रवि राणा यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनुयायांना व नागरिकांना भाजी पोळी व बुंदीच्या लाडुचे केले वाटप केला.

'डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ भारतापुरते मर्यादित नसून संपूर्ण जगासाठी प्रेरणास्थान आहेत असे माजी .खा.नवनित राणा म्हणाल्या. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले संविधान, समानतेचा अधिकार आणि शिक्षणाचे महत्त्व हे आपल्या देशाच्या प्रगतीचे मूलभूत आधार आहेत असे आ.रवि राणा म्हणाले. अमरावती येथील भिमटेकडी, उत्तम नगर, संजय गांधी नगर, दरोगा प्लॉट, बेलपुरा तसेच बडनेरा येथील राहुल नगर, अशोक नगर, समता चौक या ठिकाणी जाऊन आ.रवि राणा व मा.खा.नवनित राणा यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला हारार्पण करुन केले विनम्र अभिवादन भाजपा शहर अध्यक्ष डॉ.नितीन धांडे, डॉ.राजेंद्र गवई, अमरावती शहर पोलीस आयुक्त राकेश ओला, शहर सुधार समिती सभापती राधा कुरील, माजी भाजपा शहर अध्यक्ष किरण पातुरकर, उपमहापौर सचिन भेंडे, सुनिल खराटे, गटनेते नाना आमले, बादल कुलकर्णी, सुनिल काळे, ललीत समदुरकर, राजु कुरील, नगरसेविका मधुरा मिलींद कहाळे, कौशीक अग्रवाल, आकाश पाटील, सुधिर थोरात, प्रमोद खंडारे, नगरसेवक मिलींद बांबल, आकाश तायडे, धनराज चक्रे, सुमित कलाने, प्रविण उईके, संदीप कंधारे, प्रतिक शिंदे, राजेश सदाशिवे, नगरसेवक प्रा.श्री.प्रशांत आनंदराव वानखडे, नगरसेवक संजय हिंगासपुरे, नगरसेविका व शहर सुधार समिती उपसभापती श्रीमती सुमती ढोके, नगरसेवक श्री.अजय मदनमोहन जयस्वाल, नगरसेवक श्री.किशोर चंद्रशेखर जाधव, नगरसेवक श्री.दिपक किसनलाल साहु, नगरसेविका श्रीमती नंदा धनंजय सावदे, नगरसेवक सौ.रजनी राजेश डोंगरे, नगरसेविका सौ.गौरी शैलेंद्र मेघवानी, नगरसेविका व शिक्षण सभापती ॲड.सौ.प्रिती हर्षल रेवणे, नगरसेवक श्री.महेश धनराज मुलचंदानी, नगरसेवक श्री.योगेश रघुनाथ विजयकर, नगरसेविका सौ.अर्चना अशोक पांडे, नगरसेविका सौ.प्रियंका भुषण पाटणे, नगरसेविका मिराताई कांबळे अमरावती - भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार आणि जगासाठी प्रेरणास्थान असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त अमरावती शहरात अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला.

## देशात तिसऱ्या क्रमांकावर 'हॉट' अमरावती; तापमान ४४° पार, नागरिक हैराण

प्रतिनिधी १५ जानेवारी

**अमरावती :** जिल्ह्यात सध्या उष्णतेची तीव्र लाट कायम असून नागरिक अक्षरशः हैराण झाले आहेत. मंगळवारी दिवसभरातील कमाल तापमान तब्बल ४४.८ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले. त्यामुळे अमरावती जिल्ह्याचा देशात तिसरा क्रमांक 'हॉट' जिल्हा म्हणून नोंदवला गेला असल्याची माहिती 'आयएमडी'ने दिली आहे.

गेल्या काही दिवसांपासून तापमानात सातत्याने वाढ होत आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, पुढील चार ते पाच दिवस तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पारा ४४ अंशांच्या पुढे जाण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. सोमवारी तापमान ४३.२ अंश होते, तर मंगळवारी त्यात आणखी वाढ झाली आहे.

गुरुवारपासून पुढील तीन दिवस 'हीट वेव्ह'चा प्रभाव अधिक जाणवणार असून, उन्हाचा तडाखा दिवसेंदिवस तीव्र होत आहे. दुपारी



१२ ते ४ या वेळेत बाहेर पडणे नागरिकांसाठी धोकादायक ठरत आहे. कडक उन्हामुळे रस्ते ओस पडले असून, अंगाची लाहीलाही होत आहे.

सूर्यप्रकाशाची तीव्रता वाढल्यामुळे नागरिकांनी आरोग्याची विशेष काळजी घ्यावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. पुरेसे पाणी पिणे, थेट उन्हात जाणे टाळणे आणि आवश्यक असल्यासच घराबाहेर पडणे, असे सल्ले देण्यात आले आहेत.दरम्यान, २० एप्रिलनंतर हवामानात काहीसा बदल होण्याची शक्यता असून, आकाश अंशतः ढगाळ राहू शकते. त्यामुळे तापमानात थोडी घट होऊन नागरिकांना काही प्रमाणात दिलासा मिळण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

## 'गहुला कचुला' काळाच्या पडद्याआड

प्रतिनिधी १५ जानेवारी

**अमरावती:** साडेतीन मुहूर्तांपैकी एक मानल्या जाणाऱ्या अक्षय तृतीयेच्या दिवशी पारंपरिक पद्धतीने बनवला जाणारा 'गहुला कचुला' हा पदार्थ आज हळूहळू काळाच्या पडद्याआड जात असल्याचे चित्र दिसून येत आहे. पूर्वी या दिवशी प्रत्येक घरात पितरांना अर्पण करण्यासाठी 'गहुला कचुला' तयार केला जात असे. मोहड्याच्या पानांवर ठेवलेल्या पत्रावळीत शेवया, पापड आणि विविध जिन्नसांसह हा खास पदार्थ तयार करून अर्पण करण्याची परंपरा होती. 'गहुला कचुला' तयार करण्यासाठी सोप, जिरे, धणे, चारोळी, विलायची, लवंग, मिरे, खसखस, ओवा, शेंगदाणे, वाळ्याची मुळ (खस), कळमी, मोह फुल, गराडू कंद, सुगंधित वनस्पती द्रव्य आणि चिंच बोडूक आदी विविध घटकांचे मिश्रण वापरले जात असे. वाणी समाजातील लोक हा पदार्थ तयार करून बाजारात विक्रीस ठेवत असत.

## महामानवाला सर्वपक्षीय नेत्यांचे अभिवादन

प्रतिनिधी १५ जानेवारी

**अमरावती :** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न , महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यासाठी सर्वपक्षीय नेत्यांनी इरवीन चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला हार अर्पण करून अभिवादन केले. सोमवारी रात्रीपासूनच इरवीन चौकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी अनुयायांनी गर्दी केली होती. चौकात ठिकठिकाणी फ्लेक्स लागले होते, पुस्तके विक्रीची दुकाने सजली होती. या ठिकाणी यात्रेचे स्वरूप आले होते. खासदार बळवंत वानखडे, राज्यसभा खासदार अनिल बोंडे, माजी मंत्री यशोमती ठाकूर, आमदार सुलभा खोडके, आमदार संजय खोडके, माजी खासदार नवनीत राणा, आमदार रवी राणा, माजी खासदार अनंत गुढे, महापौर श्रीचंद तेजवानी , भाजपाचे जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख, शहर जिल्हाध्यक्ष डॉ. नितीन धांडे, रिपाई चे नेते डॉ. राजेंद्र गवई, रामेश्वर अभ्यंकर, आमदार प्रवीण तायडे, आमदार राजेश वानखडे, उद्योजक चंद्रकुमार जाजोदिया ,बबलू शेखावत,विलास इंगोले, शिवसेनेच्या नेत्या प्रीती बंड त्यांच्यासह सर्वपक्षीय नेत्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना यावेळी भावपूर्ण अभिवादन केले. यावेळी विविध संगीतमय गीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.यावेळी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत संविधानाची ७५ वर्षे' या विषयावर प्रसिद्ध विचारवंत तथा व्याख्याते संजय आवटे यांनी मार्गदर्शनपर व्याख्यान दिले. श्री. शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष , हर्षवर्धन दशमुख, माजी मंत्री डॉ. सुनील देशमुख, जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांचीही प्रामुख्याने उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते 'जीवन गौरव, जीवन संघर्ष व कर्तव्यपूर्ती' पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्य आयोजन समितीचे डॉ. पी. एस. खडसे, ॲड. दिलीप ऐडतकर, गोपीचंद मेश्राम, जगदीश गोवर्धन यांनी विशेष परिश्रम घेतले.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

बुधवार दि १५ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com



# जिल्ह्यातील जलस्त्रोतांनी गाठला तळ !

## जलसंकटाचे सावट, अनेक प्रकल्प कोरडे होण्याच्या मार्गावर

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

जिल्ह्यातील जलस्त्रोतांनी तळ गाठला आहे. जिल्ह्यातील अनेक प्रकल्प कोरडे पडण्याच्या मार्गावर आहेत. तर १८ प्रकल्पामध्ये ३० टक्कयाच्या खाली जलसाठा उरल्याने या अनेक गावांमध्ये गंभीर जलसंकट येण्याची भिती व्यक्त होत आहे. जिल्ह्यावर पाणी टंचाईचे सावट निर्माण होणार आहे.

जिल्ह्यामध्ये तीन मध्यम प्रकल्प तर १०० लघु तलाव आहेत. मध्यम प्रकल्पामध्ये वाशीम तालुक्यातील एकबुर्जी प्रकल्पाची पाणी साठवण क्षमता १.७९ दलघमी असून सध्या या प्रकल्पात २८.२४ टक्के जलसाठा उरला आहे. सोनल प्रकल्पामधून २२.१९ टक्के तर अडाण प्रकल्पामध्ये २३.६१ टक्के जलसाठा उरला आहे. वाशीम तालुक्यातील काजळांबा, कळंबा महाली, खंडाळा, सोनखास, सोयता, उमरा कापसे, संग्रहीत तलाव, मालेगाव तालुक्यातील बोरगाव, ब्राम्हणवाडा, कोल्ही, मालेगाव, मसलाखुर्द, रिधोरा, सोमठाणा, सुकांडा, रिसोड तालुक्यातील धोडप, हराळ, करडा, कोयाळी, पाचांबा, मानोरा तालुक्यातील वाईगौळ, कारंजा तालुक्यातील शाहा हे तलाव कोरडे ठण्ण पडले आहेत.

वाशीम तालुक्यातील अनसिंग बोराळा, कार्ली, सावंगा, सावरगाव जिरे, शिरपूटी, उमरा शमशोद्दीन, वाई, शेलुखुर्द, ब्रम्हा, मालेगाव तालुक्यातील डव्हा, कळंबेश्वर, मुंगळा, सोनखास, रिसोड तालुक्यातील गणेशपूर, गौढाळा, जवळा, मांडवा, मंगरूळपीर तालुक्यातील मोहरी, पिंप्री खुर्द, सारसी बोथ, सिंगढोह, चिखली, मानोरा चौसाळा, कार्ली, पंचाळा, पिंप्री हनुमान, रूई, वाटोद, कारंजा तालुक्यातील मोखडपिंप्री, ऋषी, झोडगा, बग्गी या तलावात ३० टक्क्याच्या खाली जलसाठा उरला आहे. लघुपाटबंधारे विभागाच्या नियोजनशून्य कारभारामुळे अनेक तलावातून मृत जलसाठ्यापर्यंत उपसा उपसा सुरू असल्याने तलाव कोरडे पडण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील अनेक गावांमध्ये भीषण पाणीटंचाईच्या झळा नागरिकांना सोसाव्या लागणार आहेत.

# शहरातील वाहतूक व्यवस्था विस्कटली

* पालिकेचा अतिक्रमण हटाव विभाग नावालाच
* जड वाहतुकीमुळे शहरातील चौकात वाहतुकीची कोंडी



●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

शहरातील महत्वाचे आर्थिक उलाढालीचे केंद्र असलेल्या रविवार बाजारात शहर वाहतूक पोलीसांच्या ढेपाळलेल्या नियोजनामुळे वाहतुकीची परिस्थिती दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. चिल्लर फेरीवाल्यांनी रविवार बाजारातील मेन रोड पुर्णतः काबीज केला असून हातगाडीवाल्यांचे अतिक्रमण हटविण्यात न.प. प्रशासन यंत्रणा पुर्णतः कुचकामी ठरली आहे. चौकामधून जाण्यायेण्याकरीता नागरीक, दुचाकी, चारचाकी धारकांकडून वाहतूक नियमांची पुर्णपणे पायमल्ली होत असून याकडे शहर वाहतुक पोलीसांचे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे.

पाटणी चौकातील वाहतुकीवर देखरेख करणारे ट्रॉफीक पोलीस अस्ताव्यस्त वाहतुकीकडे दुर्लक्ष करुन केवळ दुचाकी, चारचाकी धारकांना मेमो देवून त्यांच्याकडून दंड वसुल करण्यातच मग्न दिसतात. त्यातच पाटणी चौकातून होणाऱ्या जड वाहतुकीमुळे पादचाऱ्यांच्या जिविताला धोका निर्माण झाला आहे. नगर पालीकेकडून रविवार बाजारात पार्कींगची व्यवस्था केलेली असतांनाही येथे खरेदीसाठी येत असलेले नागरीक आपली वाहने मन मानेल तेथे रस्त्यावर उभी आडवी लावतात.

याचा वाहतुकीवर मोठा ताण पडतो. व्यापारी वर्गही आपली वाहने पार्कीगमध्ये उभी न करता दुकानासमोरच लावतात व येणाऱ्या ग्राहकांनाही आपली वाहने रस्त्यात लावण्यासाठी मज्जाव करीत नाहीत. रविवार बाजारात येणाऱ्या वाहनांच्या पार्कीगसाठी भाजी मार्केट परिसरात मोठी जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. मात्र नागरीक आपली वाहने तेथे लावत नाहीत. तसेच पार्कीगसाठी जाण्यायेण्याच्या रस्त्यावरही विक्रेत्यांनी आपली दुकाने थाटली असल्यामुळे याचाही अडथळा पार्कीगसाठी होतो. मात्र हे अवास्तव अतिक्रमण हटविण्यात नगर पालिकेचा अतिक्रमण हटाव विभाग असमर्थ ठरत आहे. शहरातील कायदा व सुव्यवस्था पाहणाऱ्या शहर वाहतूक यंत्रणेचे नियोजन पुर्णपणे ढेपाळलेले दिसत असून वाहतुक यंत्रणेच्या दुर्लक्षामुळे रविवार बाजाराचा हा भाग अतिशय वाहतुकीच्या दृष्टीने धोकादायक बनला आहे. मात्र न.प. प्रशासन,पोलीस विभागासोबत लोकप्रतिनिधी सुध्दा या बाबीकडे म्हणावे तितक्या गंभीरतेने पाहत नसल्याचे परिस्थितीवरुन दिसत आहे. जिल्हयाचे ठिकाण असलेल्या वाशीम शहरातील रविवार बाजाराप्रमाणेच पुसद नाका चौक, पोस्ट ऑफीस चौक आदी ठिकाणीही वाहतुकीची अतिशय गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे.

शहर वाहतुक विभागासोबतच पालिकेचा अतिक्रमण विरोधी विभागाचेही याकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिसत आहे. एकूणच रविवार बाजारातील वाहतुकीची परिस्थिती दिवसेंदिवस विस्फोटक होत चालली असून संबंधीत यंत्रणेने वेळीच या प्रकाराला पायबंद घातला नाही तर येणाऱ्या काळात येथे लहानमोठे तंटे होवून शहरातील कायदा व सुव्यवस्थेची घडी विस्कटु शकते.

## थोडक्यात

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानवंदना



●सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर●

मंगरूळपीर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त महार रेजिमेंटचे कॅप्टन साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत व संघटनेचे सचिव हवालदार समाधान इंगोले माजी सैनिक यांनी उपस्थित सैनिकांना सलामी देऊन रीतसर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना हार अर्पण करून मानवंदना दिली.

तसेच यावेळी माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष यांनी समता सैनिक दलातील सैनिक आजी-माजी सैनिक यांना शिस्तप्रिय पद्धतीने बाबासाहेब परिसरामध्ये चांगल्या प्रकारे प्रदर्शन घडविले. तसेच यावेळी नरेंद्र इंगोले , रतन कांबळे, हरिभाऊ इंगोले, संजय भगत, अरुण चक्रनारायण, नरहरी भगत, महादेव इंगोले,नरहरी खडसे , संभाजी ब्रिगेडचे जिल्हा सचिव रमेश मुंजे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार मानले केले बुद्ध वंदना घेऊन कार्यक्रम समाप्त करण्यात आला.

### सपकाळ महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी

●सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर●



येथील परमहंस झोलेबाबा विद्यालय तथा स्व.मधुकरराव ल.सपकाळ कनिष्ठ कला व विज्ञान महाविद्यालयात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात कार्यक्रम साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.राघोजी अवगण यांनी केले. प्रास्ताविकातून श्री.चेतन वानखडे यांनी वंदनीय डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जिवनकार्याचा आढावा घेतला.प्रमुख वक्ते म्हणून बोलतांना श्री.चंद्रकिशोर गोरवे यांनी विद्यार्थ्यांना समतेचा व एकात्मतेचा संदेश दिला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव तथा प्राचार्य प्रा.सुनिल सपकाळ हे होते.यावेळी विद्यार्थ्यांमधून कु.साक्षी तायडे हिने मनोगत व्यक्त करताना वंदनीय डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

### जेसी व आर जे हायस्कूलमध्ये विद्यार्थी गुणगौरव सोहळा



●सिटी न्युज ब्युरो @ कारंजा●

कारंजा एज्युकेशन सोसायटी अंतर्गत जेसी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय तसेच आर.जे.चवरे हायस्कूल व कॉन्व्हेंट यांच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक वर्ष २०२४/२५ मध्ये गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा संपन्न झाला.

भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त वाशिमजिल्हा क्रीडा अधिकारी किशोरजी बोंडे कारंजा एज्युकेशन सोसायटीचे सचिव अमल भाऊ चवरे संचालक सदस्या दिपालीताई चवरे जे सी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य हरसुले सर आर.जे.चवरे हायस्कूलच्या मुख्याध्यापिका अनिता चोपडे आर.जे.चवरे कॉन्व्हेंटच्या प्रभारी मुख्याध्यापिका हेडा मॅडम, प्रवेश गंधक सर पालक प्रतिनिधी शशिकांत ठाकूर,राजेश पाटील या सर्व मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन व भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेस हारार्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

# मायबापाची केली स्वप्नपूर्ती, ओमकार झाला पोलिसांत भरती !

●सिटी न्युज ब्युरो @रिसोड●

तालुक्यातील शेलुखडसे येथील एका युवकाने कठोर परिश्रम आणि हलाखीच्या परिस्थिवर मात करत आपल्या आईवडिलांच्या कष्टाचे चीज केले आहे. सदर युवकाचा नुकत्याच झालेल्या पोलीस भरतीत हिंगोली पोलीस दलात शिपाई पदासाठी निवड झाली आहे. कठोर परिश्रम आणि हलाखीच्या परिस्थिवर मात करण्याची त्याची जिद्द ईतर युवकांसाठी प्रेरणादायी ठरत असल्याने ओमकार ज्ञानेश्वर खडसे या युवकावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षांव होत आहे.



निवड यादी जाहीर झाल्यानंतर ही माहिती सर्वप्रथम आई-वडिलांना दिल्यावर त्यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. हलाखीच्या परिस्थित घेतलेल्या कष्टाचे चीज झाले असल्याचे समाधान ओमकाराच्या आईवडिलांच्या डोळ्यातून स्पष्ट होत असल्याचे प्रकर्षाने जाणवत होते. कायद्याचे संरक्षण करणाऱ्या संवेदनशील पोलीस विभागात आमच्या मुलाला जनसेवा करण्याची संधी मिळाली ही आमच्यासाठी खुप अभिमानास्पद बाब असल्याचे मत त्याच्या आईवडिलांनी सिटीन्यूज सुपरफास्टशी बोलतांना व्यक्त केले आहे. 'ओमकार हा मेहनती व धाडसी स्वभावाचा आहे. त्याने लहानपणापासून पोलीस होण्याचे स्वप्न पाहिले होते. त्याचे स्वप्न पूर्ण झाल्याचा आम्हाला अभिमान आहे.'

**ऋतिक गजानन खडसे** वर्गमित्र, शेलुखडसे

रिसोड तालुक्यातील शेलू खडसे येथील अल्पभूधारक शेतकरी कुटुंबातील ओमकार ज्ञानेश्वर खडसे याची हिंगोली पोलीस दलात निवड झाली आहे. या यशामुळे शेलू खडसे गावासह पंचक्रोशी व तालुक्यातून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.ओमकारच्या यशामागे त्याच्या वडिलांचे कष्ट आणि संघर्ष महत्त्वाचा घटक ठरला आहे. अवघ्या दीड एकर शेतीवर कुटुंबाचा उदरनिर्वाह करत असताना मुलांना शिक्षण देण्यासाठी त्यांनी ट्रॅक्टर कंपनीच्या सेल्स विभागात काम करत मुलाच्या शिक्षणासाठी सातत्याने मेहनत घेतली आहे. त्यांच्या या परिश्रमांचे फलित म्हणून ओमकारने पोलीस दलात स्थान मिळवले आहे.लहानपणापासूनच ओमकारचे ध्येय पोलीस होण्याचे होते. बालपणीच्या खेळांमधूनही त्याची ही आवड स्पष्ट होत असे. त्याने जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर आपले स्वप्न पूर्ण केले. ओठावर मिश्रूड फुटण्याच्या अवस्थेत त्याने मित्रांसोबत हुल्लडबाजी न करता ठरवलेले ध्येय पूर्ण करण्यावर आपले लक्ष केंद्रित करून हे यश संपादन केले असल्याची प्रतिक्रिया त्याचे वडील ज्ञानेश्वर खडसे यांनी सिटीन्यूज सुपरफास्टशी बोलतांना व्यक्त केली आहे.

# भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहाचे' आयोजन



●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

समाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाअतर्गत येत असलेल्या मागासवर्गीय मुलांचे शासकीय वातिगृह सवड ता. रिसोड येथे दिनांक ८/एप्रिल /२०२६ ते १४/एप्रिल /२०२६ या कालावधीत भारतरत्न 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहाचे'आयोजन करण्यात आले आहे.

त्यानिमित्ताने आज दिनांक ११ /एप्रिल /२०२६ रोज क्रांतिसुर्य महात्मा जोतिबा फुले यांचे जयंती निमित्त मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह सवड व शासकीय निवासी शाळा सवड यांच्या वतीने भव्य रक्त दान शिबिराचे आयोजन करण्यात आले. प्रथम महापुरुष्यांच्या प्रतिमा पूजन करून उपस्थित प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. व त्यानंतर रक्तदान शिबिराला सुरुवात करण्यात आली.

यावेळी वसतिगृह व शाळा येथील कर्मचारी तसेच वातिगृहातील विद्यार्थी असे एकूण ३७ जणांनी रक्तदान केले.

# पोलीस कर्मचाऱ्याने परत केली दागिण्यांची बॅग !

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

समाजात पोलीस दलाबद्दलचा विश्वास अधिक दृढ करणारी, प्रेरणादायी आणि अभिमानास्पद घटना दि. १४ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजे दरम्यान पाटणी चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गावर घडली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने सुरू असलेल्या मिरवणुकीदरम्यान कर्तव्यावर असलेल्या पोलीस कर्मचारी अश्फाक बेनिवाले यांनी दाखवलेल्या प्रामाणिकपणामुळे सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे.मिळालेल्या माहितीनुसार, पाटणी चौक ते शिवाजी महाराज चौक या मार्गावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त मिरवणूक सुरू असताना



वाशिम येथील रेखा प्रल्हाद चव्हाण यांची एक बॅग हातातून नकळत खाली पडली. या बॅगमध्ये सुमारे एक तोळा सोन्याचे दागिने तसेच काही रुपये व इतर महत्त्वाची कागदपत्रे आणि वस्तू होत्या.ड्युटीवर असताना ही बाब अश्फाक बेनिवाले यांच्या त्वरित लक्षात आली. दरम्यान, एका मोटारसायकलस्वाराने ती बॅग उचलून घेऊन जाण्याचा प्रयत्न केला. परंतु प्रसंगावधान राखत बेनिवाले यांनी तत्काळ त्याचा पाठलाग करून त्याला पकडले आणि बॅग सुरक्षितरीत्या परत

## प्रामाणिकपणाची जिवंत साक्ष

मिळवली. ही कृती त्यांच्या तत्परतेचे आणि सजगतेचे द्योतक ठरली. दरम्यान, बॅग हरविल्याचे लक्षात न आल्याने संबंधित दांपत्य पुढे निघून गेले होते. मात्र, संबंधित व्यक्ती परत येतील, याची खात्री असल्याने अश्फाक बेनिवाले हे त्या ठिकाणीच बॅग हातात घेऊन थांबून राहिले. काही वेळानंतर ते दांपत्य परत आले आणि बॅग आपली असल्याचे सांगताच बेनिवाले यांनी बॅगमधील सर्व वस्तूंची शहानिशा करून खात्री केली व ती बॅग त्यांच्या ताब्यात दिली.

या घटनेतून अश्फाक बेनिवाले यांनी केवळ आपले कर्तव्यच पार पाडले नाही, तर प्रामाणिकपणा, जबाबदारी आणि समाजाप्रती असलेली निष्ठा यांचे उत्कृष्ट उदाहरण घालून दिले आहे. पोलीस कर्मचारी अश्फाक बेनिवाले हे सुरकंडी येथील रहिवासी असून शहर पोलीस स्टेशन येथे कार्यरत आहेत. 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' या पोलीस दलाच्या ब्रीदवाक्याला त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून साकार केले आहे.या उल्लेखनीय कार्याबद्दल शहर पोलीस ठाण्याचे ठाणेदार संजय चौधरी यांनीही त्यांचे कौतुक केले असून, त्यांच्या या कृतीमुळे पोलीस दलाविषयीचा जनसामान्यांचा विश्वास अधिक बळकट झाला आहे. अशा कर्तव्यदक्ष आणि प्रामाणिक पोलीस कर्मचाऱ्यांमुळे समाजात सकारात्मकतेचा संदेश पसरत आहे.

# रिसोड पं.स.मध्ये भ्रष्टाचार, अधिकारी पैशासाठी लाचार !

## पंचायत समितीत' दाम करी काम' चाअनेकांना येतोय प्रत्यय



●दिपक मापारी @ रिसोड●




तालुक्यात गुटका, मटका आणि जुगारावर पूर्णपणे आळा बसत नसतानाच आता पंचायत समिती कार्यालयातील भ्रष्टाचारही शिंगेला पोहचला आहे. भ्रष्टाचाराला लगाम घालण्यास स्थानिक प्रशासन स्पेशल अपयशी ठरले आहे. त्यामुळे भ्रष्टाचारायचं चांगभलं होत असताना सर्वसामान्यांचे कंबरडे मोडत आहे. हा भ्रष्टाचार रोखण्यास स्थानिक प्रशासन फेल ठरल्याने आता रिसोड-मालेगाव मतदार संघाचे आमदार अमित झनक यांनीच याकडे जातीने लक्ष देऊन सर्वसामान्यांची जाचातून सुटका करावी, अशी मागणी होत आहे. ग्रामीण भागातील नागरिकांचे जीवनमान उंचाविण्यासाठी शासन कोट्यावधीच्या निधी खर्च करून विविध योजना राबविते. मात्र या योजना पात्र आणि गरजू लाभार्थ्यापर्यंत पोचविण्याची जबाबदारी ज्या मिनी सचिवावर आहे तिथेच माय,चा अडसर राहात आहे. दाम दिल्याशिवाय काम नाहीच, असा जणू अलिखित नियमच कार्यालयात रूढ झाला आहे.

### यंत्रणांचे अर्थपूर्ण दुर्लक्ष?

तेरी भी चूप, मेरी भी चूप, या उक्तती प्रमाणे दरोरोज उघडपणे चालणारा हा काळा कारभार गुप्तचर यंत्रणाच्या नजरेतून कसा सुटतो, असा संतप्त प्रश्न सुजान नागरिकांनी उपस्थित केला आहे.

या प्रकारामुळे सर्वसामान्यांचा शासनावरील विश्वास डळमळीत होत आहे. आता आमदार अमित झनक यांनीच तमाम वरिष्ठांना या भ्रष्ट कारभाराबाबत जाब विचारणे, धारेवर धरणे, अपेक्षित आहे. कोणत्याही कामासाठी गेलेल्या नागरिकाला टेबलवर माया'मोजल्याशिवाय कामाची फाईल पुढे सरकत नाही. काही कामासाठी तर अघोषित दरपत्रकच निश्चित असल्याचे बोलले जात आहे. खाजगी मध्यस्थ किंवा दलालाच्या मदतीशिवाय साधे काम होणेही सध्या अशक्यप्राय झाले आहे..

# जवाहर नवोदय विद्यालयात फैज फैजल व तराना फैजल यांचा प्रेरणादायी सत्कार

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●



पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालय, वाशिम येथे प्रेरणादायी वातावरणात भव्य सत्कार समारंभ पार पडला. यावेळी विदर्भ रणजी संघाचे माजी कर्णधार व आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू फैज फैजल तसेच प्रख्यात लेखिका तराना फैजल यांचा गौरव करण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात क्रीडामय वातावरणात झाली. विद्यार्थ्यांच्या संघ आणि स्थानिक क्रिकेट अकादमी यांच्यात मैत्रीपूर्ण सामना रंगला. त्यानंतर ढोल-ताशांच्या गजरात पारंपरिक पद्धतीने पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. एनसीसी कॅडेट्सनी मानाच्या सलामीसह पाहुण्यांना सभागृहात नेले. सभागृहात शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. प्राचार्य सचिन खरात यांच्या संवादात फैज फैजल यांनी आपल्या क्रिकेट प्रवासातील संघर्ष आणि चिकाटीचे महत्त्व सांगितले. 'यश ही मॅरेथॉन आहे, स्प्रिंट नाही,' असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरित केले. तराना फैजल यांनी वाचन व साहित्यनिर्मितीचे महत्त्व अधोरेखित केले.या प्रसंगी क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रीय गीताने झाली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना नवी दिशा व प्रेरणा मिळाली.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
बुधवार, दि. १५ एप्रिल २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## शहरासह ग्रामीण भागात गॅससाठी नागरिकांच्या रांगा

**खामगाव :** गॅस सिलिंडरसाठी शहरी तसेच ग्रामीण भागात नागरिकांची रांग दिसते. एप्रिलच्या कडक उन्हात नागरिकांना तासनतास उभे राहून प्रतीक्षा करावी लागत आहे.

यामुळे महिला, ज्येष्ठ नागरिक आणि कामगार वर्गाला मोठा त्रास सहन करावा लागत आहे. उन्हाचा तडाखा आणि दीर्घ प्रतीक्षेमुळे अनेकांची प्रकृतीही बिघडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. काही एजन्सीकडून नियोजनाचा अभाव असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. टोकन प्रणाली, अतिरिक्त वितरण केंद्र किंवा ठराविक वेळापत्रक जाहीर न केल्याने गोंधळाचे वातावरण निर्माण झाल्याचेही नागरिकांचे म्हणणे आहे.

एकीकडे सरकारकडून गॅसचा तुटवडा नसल्याचे सांगितले जात असताना, प्रत्यक्षात मात्र नागरिकांना अशा रांगा लावाव्या लागत असल्याने प्रशासनाच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

# दोन एकरांतील मका व ठिबक सिंचन जळून खाक

प्रतिनिधी १५ एप्रिल

## डोलखेड शिवारातील घटना; लाखोंचे नुकसान

*खामगाव : नांदुरा तालुक्यातील डोलखेड शिवारात १४ एप्रिल रोजी दुपारी शॉर्ट सर्किटमुळे अचानक आग लागून सुमारे दोन क्षेत्रातील मका पीक व ठिबक सिंचन व्यवस्था एकर जळून खाक झाली. या घटनेत तालखेड येथील शेतकरी वासुदेव नीना वसतकार यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. शेतकरी वासुदेव वसतकार यांच्या डोलखेड शिवारातील शेतात शेजारील डी.पी. जवळ झालेल्या शॉर्ट सर्किटमुळे अचानक आग लागली. यावेळी सोंगणी करुन ठेवलेल्या मक्याने पेट घेतला.*



आगीत अर्ध्यापेक्षा अधिक मका, ठिबक सिंचन व्यवस्था आणि पाईप जळून खाक झाले. या घटनेत त्यांचे मोठे करून आर्थिक नुकसान झाले असून महसूल प्रशासनाने त्वरित पंचनामा नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी होत आहे. आग लागलेल्या शेता शेजारी इतर शेतकऱ्यांनीही मोठ्या प्रमाणात मका व ज्वारीची सोंगणी करून ठेवली होती. शेतकऱ्यांनी वेळीच धाव घेऊन आग आटोक्यात आणल्याने मोठी हानी टळली.

### आगीमुळे एक एकरातील गहू जळाला!

**खामगाव :** नांदुरा तालुक्यातील नांदुरा खुर्द शिवारात शॉर्ट सर्किटमुळे लागलेल्या आगीत एका शेतकऱ्याचे एक एकर क्षेत्रातील गहू पीक जळून खाक झाल्याची घटना १२ एप्रिल रोजी घडली. या आगीत सुनील नारखेडे या शेतकऱ्याचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. नांदुरा खुर्द शिवारातील गट क्रमांक १००/२ मधील गहू पिकाला शेजारील वीज वितरणच्या रोहित्रा जवळ झालेल्या शॉर्ट सर्किटमुळे अचानक आग लागली. उष्णतेचा वाढलेला पारा आणि सुसाट वाऱ्यामुळे आग वेगाने पसरली. काही वेळातच एक एकरातील संपूर्ण गहू पीक जळून खाक झाले. घटनेची माहिती मिळताच परिसरातील शेतकऱ्यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत आग विझविण्याचे प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नांमुळे आग आटोक्यात आली आणि शेजारील इतर शेतकऱ्यांचे पीक वाचले. अन्यथा मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची शक्यता होती. यावर्षी समाधानकारक पावसामुळे पिकांची स्थिती चांगली असताना, कापणीच्या उंबरठ्यावर आलेल्या गव्हाच्या पिकाचे नुकसान झाल्याने शेतकरी अडचणीत सापडला आहे. तप्त उन्हामुळे या भागात काही दिवसांपासून आगी लागण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे काळजी घ्यावी असे आवाहन केले आहे.

## बसस्थानक परिसरात लोखंडी पाइपने मारहाण; गुन्हा दाखल

प्रतिनिधी १५ एप्रिल

**शेगांव :** शहरातील बसस्थानकाच्या मागील परिसरात एका ४५ वर्षीय व्यक्तीला लोखंडी पाइपने मारहाण केल्याची घटना सोमवारी (दि. १३) रात्री घडली. याप्रकरणी शेगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सनाउल्ला खान सलाम खान (४५, रा. लेंडी तलाव परिसर, खमुजमदारनगर, शेगाव) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, ते रात्री सुमारे ८ वाजण्याच्या सुमारास बसस्थानकाच्या मागील सार्वजनिक स्वच्छतागृहात गेले होते. तेथून बाहेर आल्यानंतर काही वेळ ओट्यावर बसले असता, सद्दाम नावाचा व्यक्ती

### ओट्यावर बेसावधपणे बसले असताना हल्ला

तेथे आला व त्यांनी तेथे बसण्याबाबत विचारणा केली. फिर्यादीने काही वेळ थांबून निघून जाणार असल्याचे सांगितले असता, आरोपीने संतापाच्या भरात हातातील लोखंडी पाइपने त्यांच्या डोक्यावर वार केला. या मारहाणीत फिर्यादीच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन रक्तस्राव झाला. तसेच आरोपीने चेहरा, कान, नाक व डाव्या हातावरही मारहाण केली. यावेळी फिर्यादीने विनवणी करूनही आरोपीने त्यांना जीवे मारण्याची धमकी देत शिवीगाळ केल्याचे तक्रारीत नमूद आहे.

# ‘जय भीम’ च्या घोषणांनी दणाणले खामगाव

प्रतिनिधी १५ एप्रिल

**खामगाव :** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त मंगळवारी खामगाव शहरात उत्साह, अभिमान आणि एकात्मतेचे अनोखे चित्र पाहायला मिळाले. पहाटेपासूनच ’जय भीम’च्या घोषणांनी वातावरण भारावून गेले होते. संपूर्ण शहर निळ्या पताका, बॅनर्स व रोषणाईने सजून उत्सवमय झाले होते.



भीमजयंतीनिमित्त शहरात भव्य मिरवणुका, सांस्कृतिक कार्यक्रम आणि विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होत महामानवाला कृतज्ञतापूर्वक अभिवादन केले. विविध ठिकाणी पुष्पहार अर्पण, रक्तदान शिबिरे, तसेच समाजजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील प्रमुख आठ मंडळांनी शोभायात्रेत उत्साहाने सहभाग घेत विविध आकर्षक देखावे सादर केले. खामगाव ग्रामीणसह सुटाळा, घाटपुरी, सजनपुरी आणि जनुना या परिसरांतही मोठ्या उत्साहात जयंती साजरी करण्यात आली. मिरवणुकीत बाळापूर फैलातील अशोक, भीमशक्ती, सम्राट क्रीडा

### भव्य मिरवणुका, सामाजिक उपक्रमांचा उत्साह

मंडळ तसेच शंकर नगरातील समता, पंचशील आणि तथागत बहुउद्देशीय क्रीडा मंडळांनी सादर केलेले देखावे विशेष आकर्षण ठरले. शिवाजीनगर पोलिस स्टेशन हद्दीतील दाळफैल व जुनाफैलातील सिद्धार्थ मंडळांनीही प्रभावी सहभाग नोंदवून मिरवणुकीत चैतन्य निर्माण केले. दुपारी ५ वाजता सुरू झालेली शोभायात्रा रात्री १० वाजेपर्यंत उत्साहात पार पडली. खामगाव शहरातील आठ प्रमुख आठ मंडळांनी शोभायात्रेत सहभाग घेत विविध आकर्षक देखावे सादर केले. ग्रामीण भागातील मंडळांनीही मोठ्या उत्साहात सहभाग नोंदवून कार्यक्रमाला व्यापक स्वरूप दिले. मिरवणुकीत आबालवृद्धांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग दिसून आला, तर तरुणाईचा उत्साह आणि जोश विशेष लक्षवेधी ठरला. विविध सामाजिक व सेवाभावी

संघटनांनी पिण्याचे पाणी, चहा व अल्पोपहाराचे वाटप करून सेवाभावाचे उदाहरण घालून दिले. माळी सेवा मंडळ, पॅन्थर सेना, शिवशक्ती काळी-पिवळी संघटना, गुरुद्वारा सिंह सभा, विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, हिंदू राष्ट्र सेना, स्वाभिमानी आंबेडकरवादी अधिकारी कर्मचारी संघटना आदींसह अनेकांनी या उपक्रमात सहभाग दिला.

## वीजपुरवठा वारंवार खंडित; ग्रामस्थ त्रस्त

**खामगाव :** खामगाव तालुक्यातील अनेक गावांमध्ये मागील आठवड्यापासून वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. दिवस-रात्र कोणत्याही वेळी अचानक वीज खंडित होत असल्यामुळे नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. या संदर्भात महावितरणच्या निष्काळजीमुळे ही समस्या निर्माण झाल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे. एका उपकेंद्रांतर्गत सुमारे सहा ते सात हजार लोकसंख्या असलेल्या गावांचा समावेश असून, या भागात आठवडाभरात अनेकवेळा वीजपुरवठा खंडित झाल्याची नोंद आहे. वारंवार खंडित होणाऱ्या विजेमुळे घरगुती कामकाज, शेतीसाठी लागणारी मोटारपंप व्यवस्था तसेच लघु उद्योगांवर परिणाम होत आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी वीजपुरवठा खंडित झाल्यास नागरिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे.

# उन्हाळी तेलवर्गीय पिकांचे उत्पादन घटले

## वाढत्या खर्चामुळे शेतकऱ्यांचा कल पर्यायी पिकांकडे

प्रतिनिधी १५ एप्रिल

**खामगाव :** यंदा उन्हाळी तेलवर्गीय पिकांचे उत्पादन अत्यल्प झाल्याचे दिसून येत आहे. रब्बी हंगामात या पिकांकडे शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात पाठ फिरवल्याचा हा परिणाम असल्याचे स्पष्ट होत आहे. वाढता उत्पादन खर्च, अनिश्चित बाजारभाव आणि हवामानातील बदल ही या स्थिती मागील प्रमुख कारणे मानली जात आहेत. त्यामुळे शेतकरी तेल वर्गीय पिकां ऐवजी इतर नगदी पिकांकडे वळत आहेत.

खाद्य तेला चे बाजारातील दर वाढले असले तरी त्याचा थेट फायदा शेतकऱ्यांना होत नसल्याची खंत व्यक्त केली जात आहे. प्रत्यक्षात तेल वर्गीय पिकांना हमखास आणि समाधानकारक दर मिळत नसल्याने शेतकऱ्यांचा या पिकांवरील विश्वास कमी झाला आहे. भारत आपल्या एकूण खाद्यतेल गरजे पैकी सुमारे एक तृतीयांश तेल आयातीवर अवलंबून



आहे. अशा परिस्थितीत देशांतर्गत तेल बियांचे उत्पादन वाढवणे गरजेचे असताना शेतकऱ्यांचा या पिकांकडे घटता कल ही चिंतेची बाब असून प्रभावी धोरणांची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. चालू रब्बी हंगामात खामगाव तालुक्यात केवळ १९९ हेक्टर क्षेत्रावर तेलवर्गीय पिकांची लागवड झाल्याची माहिती कृषी विभागाकडून मिळाली आहे. यामध्ये तीळ २० हेक्टर, भुईमूग १५४ हेक्टर, सूर्यफूल १० हेक्टर, तर मोहरीची केवळ १५ हेक्टर क्षेत्रावर लागवड झाली आहे. अत्यल्प क्षेत्रावर लागवड झाल्याने उत्पादनातही मोठी घट झाल्याचे स्पष्ट होत आहे. तेल वर्गीय पिकांना बाजारात चांगला भाव मिळत असला तरी बाजार समितीत या पिकांची आवक अत्यल्प असल्याचे चित्र आहे. बाजार समितीत मागील काही दिवसांत तीळ, भुईमूग, करडई आणि मोहरी ही पिके विक्रीसाठी येत आहेत; मात्र त्याचे प्रमाण खूपच कमी आहे. तीळ, करडई आणि मोहरी ही पिके केवळ दोन ते तीन क्विंटल प्रमाणातच विक्रीस येत आहेत. भुईमुगाची काढणी अद्याप सुरू व्हायची आहे.

## समता, बंधुता व न्यायासाठी बाबासाहेबांचे विचार आवश्यक : शेंडे

### रा.स्व.संघ खामगावच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन!

प्रतिनिधी १५ एप्रिल

**खामगाव :** भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीने खामगाव येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे १४ एप्रिल रोजी माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा संघचालक बाळासाहेब काळे, प्रमुख वक्ते अतुल शेंडे (वर्धा), प्रांत संयोजक, विवेक विचार मंच, नगर संघचालक प्रल्हाद निमकंडे तर भारतीय बौद्ध महासभा खामगाव अध्यक्ष दादासाहेब हेलोडे यांची उपस्थिती होती.

अतुल शेंडे यांनी आपल्या भाषणात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे जतन करून समाजात समता, बंधुता आणि न्याय प्रस्थापित करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल असे प्रतिपादन केले. बाबासाहेबांनी आयुष्यभर दलित, वंचित व दुर्लक्षित घटकांच्या उन्नतीसाठी संघर्ष करत मानवतेचा संदेश दिला



असून, ‘उठा, शिका आणि संघर्ष करा’ हा त्यांचा प्रेरणादायी मंत्र आजही समाजासाठी मार्गदर्शक ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले. बाळासाहेब काळे यांनी समाजात सर्व घटकांमध्ये एकरूपता निर्माण झाली नाही, तर राष्ट्र परमवैभवाच्या शिखरावर पोहोचू शकत नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाचे संचालन गजानन वायचळ यांनी तर आभार दादासाहेब हेलोडे यांनी मानले. कार्यक्रमाला रा.स्व.संघाचे स्वयंसेवक व पदाधिकारी उपस्थित होते.

## आकाशात विविधरंगी प्रकाश उत्सव

**अकोला :** समाज जीवनाच्या अधिक समृद्धीसाठी उन्हाळ्यात अनेक ठिकाणी विविध सप्ताह, शिबिरे, मेळावे आयोजित होत असतात. सध्या स्थितीत आकाशात होणाऱ्या अनेक अनोख्या आकर्षक घडामोडींमध्ये सहभागी होण्याचे आवाहन विश्वभारती केंद्राद्वारे करण्यात येत आहे. सूर्यमालेतील आठ ग्रहांपैकी नुसत्या डोळ्यांनी दिसणाऱ्या पाच ग्रहांपैकी मिथुन राशीतील गुरु ग्रह संध्याकाळी आकाश मध्याशी तर तेजस्वी शूक्र ग्रह वृषभ राशीत पश्चिम आकाशात ठळक स्वरूपात बघता येईल. पहाटे पूर्व आकाशात बुध, मंगळ आणि शनी ग्रहांच्या सुरु असलेल्या शर्यतीत सहभागी होता येईल.

# शासकीय प्रमाणपत्रांवर लाभार्थ्यांचा फोटो व क्यूआर कोड

## आता थांबणार गैरप्रकार !

प्रतिनिधी १५ एप्रिल

**खामगाव :** शासकीय दाखले व बनावटगिरीला प्रमाणपत्रां मधील आळा घालण्यासाठी महसूल विभागाने मोठे आणि आधुनिक पाऊल उचलले आहे.

तहसीलदार व उपविभागीय अधिकारी कार्यालयांतून दिली जाणारी सर्व प्रमाणपत्रे हायटेक स्वरूपात उपलब्ध होणार असून, त्यावर लाभार्थ्यांचा फोटो तसेच क्यूआर कोड/बारकोड असणार आहे. यामुळे प्रत्येक प्रमाणपत्राची सत्यता काही सेकंदांत तपासता येणार असून गैरप्रकारांना आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. तहसीलदार व उपविभागीय अधिकारी कार्यालयांतून आता हायटेक स्वरूपातील प्रमाणपत्रे देण्यात येणार आहेत. या प्रमाणपत्रां वर लाभार्थ्या चा फोटो तसेच क्यूआर कोड/बारकोड असणार आहे. यामुळे सत्यता तपासण्यास मदत होणार आहे. शासकीय प्रमाणपत्रांमधील बनावटगिरी रोखण्यासाठी महसूल विभागाने नवीन हायटेक प्रणाली लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. या नव्या पद्धतीनुसार तहसीलदार व उपविभागीय अधिकारी कार्यालयांतून दिल्या जाणाऱ्या सर्व प्रमाणपत्रां वर लाभार्थ्या चा फोटो तसेच क्यू आर कोड/बारकोड असणार आहे. त्यामुळे कोणतेही प्रमाणपत्र स्कॅन करून त्याची तत्काळ सत्यता पडताळता येणार असून, बनावट कागदपत्रांना आळा बसणार आहे. या नव्या प्रणालीमुळे



शासकीय प्रमाणपत्रांची सत्यता सहज तपासता येणार आहे. क्यूआर कोडच्या माध्यमातून तत्काळ पडताळणी होणार असल्याने बनावट कागदपत्रांना आळा बसण्यास मदत होणार आहे

## उज्ज्वल पब्लिक स्कूलमध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी



प्रतिनिधी १५ एप्रिल

**बोरगाव मंजू :** येथील उज्ज्वल पब्लिक स्कूलमध्ये भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला नायब तहसीलदार नरेंद्र सोनवणे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे दीपप्रज्वलन करून पुष्पहार अर्पण केला व विनम्र अभिवादन केले. याप्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. उज्वला नरेंद्र सोनवणे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक आणि सामाजिक क्रांतीच्या विचारांवर प्रकाश टाकला. ’बाबासाहेबांचे विचार हे प्रगत समाजासाठी दीपस्तंभ आहेत,’ असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. या कार्यक्रमाला प्रशासकीय अधिकारी सौ. निता राजेंद्र बोबडे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच या सोहळ्याला स्वाती जैन, मोहिनी इंगळे, स्मिता पाटील, कुमुद काटोले, शारदा देशमुख, दुर्गा आसोलमोल, पूजा गावंडे, जया हगवणे आदींची उपस्थिती होती.

## अकोला जाळित हत्याकांड प्रकरणी आरोपींना फाशीची मागणी ; विश्व हिंदू परिषद–बजरंग दल



प्रतिनिधी १५ एप्रिल

**अकोट :** अकोला येथे काही दिवसांपूर्वी घडलेल्या जाळित हत्याकांडाच्या पार्श्वभूमीवर आरोपींना कठोर शिक्षा देण्याची मागणी करत विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाच्या वतीने अकोट येथील उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

सदर प्रकरणात हिंदू तरुणी रविना पवार हिला जिवंत जाळून ठार मारल्याचा आरोप असलेल्या मुख्य आरोपीसह त्याच्या साथीदारांवर कठोरात कठोर कारवाई करावी, तसेच त्यांना फाशीची शिक्षा सुनावण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, जिल्हा व राज्यात अशा प्रकारच्या घटनांमुळे समाजात संतापाची भावना निर्माण झाली असून संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींना तात्काळ शिक्षा देणे आवश्यक आहे. तसेच अशा गुन्ह्यांना आळा बसण्यासाठी कठोर कायदेशीर पावले उचलावीत, अशीही मागणी करण्यात आली. यावेळी संबंधित संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घ्यावी व पीडितेला न्याय मिळवून द्यावा, असे आवाहन केले. निवेदन देताना विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## धनुर्विद्या प्रशिक्षण शिबिराचे आयोजन



**अकोला :** अकोला जिल्हा धनुर्विद्या संघटना व अकोला आर्चरी अकॅडमीच्या संयुक्त विद्यमाने १४ ते ३० एप्रिल या कालावधीत धनुर्विद्या प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सहा वर्षांवरील विद्यार्थ्यांसाठी खास संधी असलेले हे शिबिर सावित्रीबाई फुले कन्या शाळा, अग्रेसन चौक येथे सकाळी ६ ते ७ व ७ ते ८ या दोन सत्रांत घेतले जाईल. शिबिरासाठी आवश्यक सर्व साहित्य संघटनेमार्फत उपलब्ध करून देण्यात येईल.

धनुर्विद्येचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण मिळावे आणि त्यातून भविष्यात उत्तम खेळाडू तयार व्हावे या उद्देशाने प्रशिक्षण महत्त्वाचे आहे. त्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे.

## प्रभा प्रकाश कॉन्व्हेंटमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी



प्रतिनिधी १५ एप्रिल

**आलेगाव:** स्थानिक प्रभा प्रकाश कॉन्व्हेंट येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने शाळेत विविध सांस्कृतिक व शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री महावीर जैन होते. तसेच परिवेक्षक श्री निलेश पस्तापुरे आणि चंदा मुर्तडकर यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या प्रसंगी विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनावर आधारित प्रेरणादायी भाषणे दिली व भीमगीते सादर केली. जयंतीनिमित्त आयोजित वक्तृत्व स्पर्धेत इयत्ता ५ वी ची विद्यार्थिनी कुमारी दिव्यांशी बसवानाथे हिने प्रथम क्रमांक पटकावला, तर निबंध स्पर्धेत कुमारी समीक्षा तेलगोटे हिने प्रथम क्रमांक मिळवून यश संपादन केले. कुमारी दिव्यांशी हिने सुंदर गीत गाईले.

# सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

बुधवार, दि. १५ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


# भीषण गर्मीत शहरात वीज गायब झाल्याने नागरिक हवालदिल

## ♦ विठ्ठल नगरातील नागरिकांना रात्र काढावी लागली अंधारात

प्रतिनिधी १५ एप्रिल





**अकोला :** सध्या संपूर्ण देशभरात अकोल्याचे तापमान हे सर्वाधिक असल्याने नागरिक भीषण गर्मीने त्रस्त झाले असताना दुसरीकडे अचानक वीज जाण्याचे प्रमाण वाढल्याने नागरिक हवालदिल झाले आहेत. भीषण गर्मी पासून बचाव करण्यासाठी कुलर आणि एसी च्या थंड वाऱ्याची आतुरतेने वाट पाहणाऱ्या ग्राहकांच्या आशा महावितरण ने धुळीस मिळवल्या आहेत. वीज पुरवठा खंडित झाल्याने ग्राहकांची मोठी गैरसोय होत आहे महावितरणने दर्जेदार वीज पुरवठ्याचा दावा करू नये मंगळवारी शहराच्या अनेक भागांमध्ये वीज पुरवठा खंडित झाला ज्यामुळे लोकांवर घामाघुम होण्याची वेळ आली. शहरातील मोठी उमरी परिसरातील विठ्ठल नगरात मंगळवारी रात्री अचानक वीजपुरवठा खंडित झाल्याने वीस ते पंचवीस घरात राहणाऱ्या नागरिकांना संपूर्ण रात्र अंधार आणि भीषण गर्मीत तसेच मच्छरांच्या त्रासात काढावी लागली. महावितरणच्या कर्मचाऱ्यांना माहिती दिल्यानंतर कर्मचारी परिसरात पोचले त्यांनी विद्युत पुरवठा सुरळीत करण्याचा प्रयत्न केला परंतु वीज पुरवठा सुरळीत न झाल्याने नागरिकांना संपूर्ण रात्र अंधारात काढावी लागली यामुळे नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे वीज वितरण कंपनीच्या आपातकालीन हेल्पलाइन ला घेऊन सुद्धा नागरिकांमध्ये असंतोष दिसत आहे हा नंबर केवळ शोभेची वस्तू ठरत आहे या नंबर वर संपर्क साधल्यावर सुद्धा कुठलीच मदत मिळत नसल्याचे नागरिकांनी सांगितले.

### महावितरण चा दर्जेदार वीज पुरवठा करण्याचा दावा फोल

महावितरण तर्फे दर्जेदार वीज पुरवठा करण्याचा दावा केला जात आहे परंतु जसजशी उष्णता वाढत आहे तसतसे यंत्रणेतील त्रुटी उघड होत आहेत काही भागांमध्ये तीस मिनिटे तरी इतर भागांमध्ये दीड तास वीज पुरवठा खंडित होत आहे लोकांचे म्हणणे असे आहे की जर आत्ताच परिस्थिती इतकी गंभीर असेल तर उन्हाचा पारा ४५ अंश सेल्सिअस चे वर गेल्यास परिस्थिती गंभीर होईल राज्यात दर्जेदार वीज पुरवठा उपलब्ध नाही नागरिकांच्या तक्रारीकडे दुर्लक्ष केले जात आहे त्यामुळे लोकांना विज गेल्यावर उकाड्यात घाम गाळावा लागत आहे

# मनपा मधील पाणी वापराचे आता होणार जल लेखापरीक्षण

प्रतिनिधी १५ एप्रिल

## ♦ राज्यात आजपासून जल पंधरवाड्याला सुरुवात




**अकोला :** महानगरपालिकेतील पाणी वापराचे लेखापरिक्षण म्हणजे पाणीपुरवठ्याची कार्यक्षमता, गळती, आणि वसुलीची तपासणी करणे होय. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम २००५ आणि राज्य जलनितीनुसार पाण्याचा अपवय टाळण्यासाठी आणि उत्पादकता वाढविण्यासाठी दरवर्षी प्रकल्पांचा जल लेखा तयार करून तो सूक्ष्म पद्धतीने तपासने बंधनकारक आहे. राज्यातील महानगरपालिका, ग्रामपंचायती आणि ग्रामपंचायतींच्या हद्दीतील थेट पाणी वापराबाबत जल लेखापरीक्षण केले जाणार आहे. राज्य जलसंपदा विभाग २६ एप्रिल रोजी हे जल लेखापरीक्षण करणार आहे. जलसंपदा विभागाने १५ एप्रिल ते ३० एप्रिल या कालावधीत जल व्यवस्थापन कृती पंधरवडा आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे. जल व्यवस्थापन कृती पंधरवड्याची सुरुवात १५ एप्रिल रोजी होईल. ३० एप्रिल रोजी संबंधित जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत जिल्हा मुख्यालयात आयोजित कार्यक्रमाने याची सांगता होईल. राज्य जलसंपदा विभागाने या संदर्भात एक शासकीय आदेश जारी केला आहे.

### आदेशात काय म्हटले आहे!

◆शासकीय आदेशानुसार, १६ एप्रिल रोजी जलसंपदा विभागाचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाईल. १७ एप्रिल रोजी, 'माझे कार्यालय स्वच्छ आणि सुंदर करा' आणि पर्जन्यजल संचयन यावर एक कार्यक्रम आयोजित केला जाईल. २१ एप्रिल रोजी धरण आणि कालवे स्वच्छता मोहीम, नदी प्रदूषण नियंत्रण आणि शेतजमिनीची दुरुस्ती केली जाईल. २२ एप्रिल रोजी उपसा सिंचनाच्या पाणी परवान्यांसंबंधीच्या तक्रारींवर विचार केला जाईल. २३ एप्रिल रोजी पाणी वापरासंदर्भात नियोजन बैठक होईल. २४ एप्रिल रोजी पाणी दर, पाणी बिल वसुली आणि सिंचन ई-प्रणाली यावरही विचार केला जाईल.

# प्रभागातील पाणी प्रश्नावरून नगरसेवक मनोज पाटील आक्रमक

प्रतिनिधी १५ एप्रिल

## ♦ प्रभागात नवीन पाइपलाईन टाकण्याची मागणी

**अकोला :** सोमवारी महानगरपालिकेची महासभा पार पडली. या सभेत सीमावृद्धी क्षेत्रातील प्रभागंमधील पाणीटंचाई निवारण्यासाठी जिल्हा नियोजन समितीकडे प्रस्ताव पाठवण्याबाबत चर्चा सुरू होती. या चर्चेत सहभागी होत शिवसेनेचे नगरसेवक मनोज पाटील यांनी आपल्या प्रभागातील पाणीप्रश्नावर जोरदार आवाज उठवला.



नगरसेवक मनोज पाटील यांचा प्रभागही विस्तारित क्षेत्रात येत असल्याने, त्यांनी महासभेत आपली बाजू मांडताना प्रभागातील पाणी समस्येवर लक्ष केंद्रित केले. त्यांनी मागणी केली की, त्यांच्या प्रभागात ग्रामपंचायत काळात टाकलेली पाइपलाईन अत्यंत जुनी आणि कमी व्यासाची आहे. प्रभागातील नागरिकांची तहान भागवण्यासाठी ही पाइपलाईन अपुरी पडत आहे. त्यामुळे या ठिकाणी मोठी आणि नवीन पाइपलाईन टाकण्यात यावी.

याशिवाय, हा प्रभाग जेव्हा ग्रामपंचायतीमध्ये होता, तेव्हा बांधलेली पाण्याची टाकी आताच्या नागरिकांना पूर्णपणे पाणीपुरवठा करू शकत नाही. कारण त्यावेळची लोकसंख्या आणि आजची लोकसंख्या यामध्ये मोठा फरक आहे, परिणामी नागरिकांना आठ-आठ दिवस पाणी मिळत नाही. त्यामुळे या प्रश्नावर लवकरात लवकर निर्णय घेऊन ही समस्या कायमस्वरूपी मार्गी लावावी, अशी मागणी त्यांनी केली. त्यांच्या या मागणीचे खुद्द महापौरांनीही कौतुक केले आणि ही समस्या लवकरात लवकर सोडवण्याचे आश्वासन दिले.

# शहरात तीन ठिकाणी चोरी, लाखो रुपयांचा ऐवज लंपास

प्रतिनिधी १५ एप्रिल



**अकोला :** येथील गंगानगर परिसरात चोरट्यांनी धुमाकूळ घातला. १३ ते १४ एप्रिलच्या मध्यरात्री घडलेल्या या घटनांमध्ये चोरट्यांनी लाखो रुपयांचा ऐवज लंपास केला.

मिळालेल्या माहितीनुसार, अली पब्लिक स्कूल रोडलगत असलेल्या डुप्लेक्समध्ये राहणारे शेख निसार शेख मोला हे पत्नीसमवेत १२ एप्रिल रोजी गावी गेले होते. घर बंद असल्याची संधी साधून चोरट्यांनी कुलूप तोडून घरात प्रवेश केला. त्यांनी कपाटातील सोन्याचे हार, कानातले तसेच चांदीचे पैंजण असा ऐवज लंपास केला. या चोरीत सुमारे साडेचार लाख रुपयांच्या दागिन्यांचा समावेश असल्याचे शेख निसार यांनी सांगितले. तीन तोळे सोने व सुमारे पन्नास तोळे चांदीचे दागिने चोरट्यांनी लंपास केल्याची माहिती आहे. १४ एप्रिल रोजी सकाळी शेख निसार घरी परतले असता घराचे कुलूप तुटलेले व आतमधील सामान अस्ताव्यस्त दिसून आले. चोरी झाल्याचे लक्षात येताच त्यांनी तत्काळ जुने शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. पोलिसांनी गुन्हा नोंदवून घटनास्थळी पाहणी केली. एकाची दुचाकी चोरी झाली तर याच रात्री अमीन शाह चक्की गल्लीमध्येही शेहजाद नामक व्यक्तीच्या घरी चोरी झाली. अशी माहिती आहे. अकोला शहरात वाढत्या चोरीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर रात्रीच्या वेळी पोलीस रात्रगस्त वाढवावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# रामदास पेठ पोलीस स्टेशनचे कामकाज आता आगरकर विद्यालयातून

प्रतिनिधी १५ एप्रिल




**अकोला :** रामदास पेठ पोलीस स्टेशन ची इमारत जुनी झाल्याने तेथे कामकाज करण्यास पोलिसांना अडचणीचा सामना करावा लागत आहे त्यामुळे आता रामदास पेठ पोलीस स्टेशनचे लवकरच नूतनीकरण होणार आहे. ही जुनी इमारत पाडून त्या ठिकाणी नवीन आधुनिक पोलीस स्टेशनची निर्मिती होणार आहे. नागरिकांना त्यांच्या पोलीस स्टेशनची जुळलेल्या समस्यांबाबत कुठलीही अडचण येऊ नये म्हणून रामदास पेठ पोलीस स्टेशनचे स्थानांतरण अग्रसेन रोड ते माल धक्क्याकडे जाणाऱ्या आगरकर विद्यालयाच्या मागील इमारतीत करण्यात आले आहे. या ठिकाणी रामदास पेठ पोलीस स्टेशन साठी पर्यायी जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. जोपर्यंत रामदास पेठ पोलीस स्टेशन ची नवीन अद्यावत इमारत तयार होत नाही, तोपर्यंत आगरकर विद्यालयाच्या मागील इमारतीतून पोलीस स्टेशनचे कामकाज सुरू राहील अशी माहिती रामदास पेठ पोलीस स्टेशनचे ठाणेदार शिरीष खंडारे यांनी दिली. मागील अनेक दिवसांपासून रामदास पेठ पोलीस स्टेशनची जागा कमी पडत असल्याने येथे कार्यरत पोलीस कर्मचाऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असे रामदास पेठ पोलीस स्टेशनची नवीन इमारत बांधण्याची मागणी जुनी होती परंतु आता ही मागणी पूर्ण होत असल्याने पोलीस कर्मचाऱ्यांना ते सुद्धा आनंद व्यक्त होत आहे

# नगरसेवक आकाश कवडे यांच्या वाहनाची तोडफोड

## ♦ राजकीय वैमनस्यातून हल्ला झाल्याचा आरोप




प्रतिनिधी १५ एप्रिल

**अकोला :** काँग्रेसचे स्वीकृत नगरसेवक आकाश कावडे यांच्या कारची मंगळवारी रात्री तोडफोड करण्यात आली. दाबकी रोड पोलिस ठाण्याच्या हद्दीत राजकमल चौकाजवळील त्यांच्या निवासस्थानाजवळ पार्क केलेल्या त्यांच्या वाहनावर अज्ञात हल्लेखोरांनी तोडफोड करून नुकसान केले. कवडे यांनी या घटनेबाबत तक्रार दाखल केली आहे. तक्रारीच्या आधारे, पोलिसांनी (एनसीडी) कलमांनुसार अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. हा हल्ला राजकीय वैमनस्यातून झाला असून आरोपींना अटक करण्याची मागणी आकाश कवडे यांनी केली आहे.

# 'माझी नदी – माझी जबाबदारी' उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी १५ एप्रिल

## ♦ 'माझा प्रभाग – स्वच्छ प्रभाग' हे अभियानास प्रारंभ



**अकोला :** 'माझी नदी - माझी जबाबदारी' या धर्तीवर 'माझा प्रभाग – स्वच्छ प्रभाग' हे अभियान अकोला भाजपा च्या वतीने राबविण्यात आले असून या उपक्रमाची सुरुवात आज पासून करण्यात आली. या उपक्रमामध्ये अकोला शहरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

भारतीय जनता पक्षाच्या स्थापना दिनानिमित्त अकोला महानगरपालिकेचे स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांच्या संकल्पनेतून अकोला शहराची जीवनवाहिनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मोरणा नदीच्या स्वच्छता अभियानाला सुरुवात करण्यात आली. स्वच्छता अभियानामध्ये भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते तसेच सर्वसामान्य नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. एकेकाळी जलकुंभीने वेढलेली मोर्णा नदी आता मोकळा श्वास घेताना दिसत आहे. मोरणा नदीच्या स्वच्छते करिता पोकल्यान मशीन, जेसीबी तसेच अत्याधुनिक यंत्रणांचा वापर करून नदीमधील जलकुंभी काढण्याचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे. मोरणा नदीतून जलकुंभी काढण्याचे काम अकोली जहागीर, लक्झरी बस स्थानक, रामसेतू पूल व इतर ठिकाणी सुरू आहे. याच बरोबर महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती तसेच आमदार रणधीर सावरकर यांच्या वाढदिवसानिमित्त अकोला महानगरात सामाजिक बांधिलकीचा संदेश देणारे विविध उपक्रमास सुरुवात करण्यात आली. याच संयुक्त मंगल पर्वाच्या पार्श्वभूमीवर 'माझा प्रभाग - स्वच्छ प्रभाग' हे अभियान सुध्दा राबविण्याचा संकल्प अकोला महानगर भाजपाने सुरू केला आहे. महानगरातील नागरिकांचे आरोग्य, स्वच्छता आणि पर्यावरण संरक्षण या उद्देशाने हे अभियान सातत्याने राबविण्यात येणार असून, यासाठी नागरिक आणि प्रशासनाने सक्रिय सहभाग घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. शहरवासियांनी या अभियानात उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन महापौर सौ. शारदा रणजित खेडकर, स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल, उपमहापौर अमोल सुधाकर गोगे, सभागृह नेते पवन महल्ले, भाजपचे शहराध्यक्ष जयंत मसने यांनी केले आहे.

# पंचशील नगरातील घरात सिलिंडर स्फोट



प्रतिनिधी १५ एप्रिल

**अकोला :** मंगळवारी रात्री पंचशील नगर बाबासाहेब आंबेडकर चौक, गाडगे महाराज विद्यालय जवळ एका घरात सिलेंडरचा स्फोट झाला. घरातील सर्व वस्तु जळून खाक झाल्या. स्थानिक नागरिकांनी आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. अग्निशामक दलाला धीरज खंडारे यांनी कॉल केला. तसेच अग्निशामक दलाची गाडी येइपर्यंत धीरज खंडारे आणि या भागातील सामाजिक कार्यकर्त्यांनी आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. नंतर अग्निशमन दल आणि सिव्हिल लाइन पोलिस स्टेशन च्या ठाणेदार, त्यांचा ताफा घटनास्थळी दाखल झाला होता. परंतु आगीमुळे संबंधित व्यक्तीचे बरेच नुकसान झाले. धुराचे लोट परिसरात पसरले होते.

# देशमुख महिला मंडळाची मासिक सभा उत्साहात संपन्न

प्रतिनिधी १५ एप्रिल

**अकोला :** देशमुख महिला मंडळाची मासिक सभा स्थानीक हॉटेल सेंटर प्लाझा येथे 'इरकल' ग्रुप च्या आयोजनात थाटात संपन्न झाली. यावेळी ड्रेस कोड सह विविध स्पर्धा घेण्यात आल्या. यावेळी मंडळाच्या अध्यक्षा राजेश्री ताई , सचिव स्वप्नाली ताई , कोषाध्यक्ष प्रतिभा ताई , जेष्ट सल्लागार कविता ताई , कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या अंजली ताई , गृप लीडर वर्षा ह्या मंचावर उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरवात दीप प्रज्वलन व महात्मा ज्योतिबा फुले जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस हारार्पण व पुजन करून करण्यात आली. त्यानंतर पुष्पगुच्छ देऊन सर्वांचे स्वागत अनुक्रमे गृप लीडर वर्षा , माया ताई, उज्वला संदीप , वंदना ताई यांनी केले. प्रमुख पाहूण्यांच मार्गदर्शन व अध्यक्षीय भाषणा नंतर आभारप्रदर्शन सुनीता ताईंनी केले.

मंडळात २५२ सदस्य असून त्यांचे १२ गृप करण्यात आले. प्रत्येक गृपला यावेळी साड्यांचे नावे देण्यात आली असून या महिन्यात मासिक सभेची जबाबदारी 'इरकल' गृप कडे होती. मंडळ दर महिन्याला एक सामाजिक उपक्रम राबवीत असते. या महिन्यात भाजी पाला, फळे विक्री करणाऱ्या गरजु लोकांना छत्री वितरण तसेच एका अंध व्यक्ती ला गादी, ऊशी चादर, पॅन्ट शर्टपीस, एक स्पिकर, अशा गरजु वस्तू देऊन हा उपक्रम घेण्यात आला. ह्या प्रोजेक्ट ची माहिती आणि प्रमुख पाहुण्यांची माहिती छाया ताईंनी दिली. सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीसुर्य माहात्म्या जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या आगमनाने झाली. महात्मा जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांची



वेशभूषा सुषमा देशमुख, मंजु देशमुख यांनी केली. संचालन शुभांगी यांनी केले. स्वागत गित कविता ताई आणि ज्योती ताईंनी गाईले. 'इरकल' ची माहिती उज्वला संदीप यांनी दिली. मेंबर्स चे गुण वैशिष्ट्य वासंती आणि शितल यांनी सांगितले. हनुमान प्रश्नावली सुजाता ताई आणि सुनीता ताईंनी घेतले. ड्रेस कोड परीक्षण वंदना ताई, उज्वला योगेश देशमुख, निता , यांनी केले . हाऊजी गेम माया ताई, आणि सुषमा ताई यांनी घेतले. सुजाता, वर्षा, उज्वला, निता, ज्योती, कविता, यांनी मराठी गाण्यावर नृत्य केले. ड्रेस कोड बक्षीस निता, संगीता, संध्या, विजया, वैशाली, माधुरी, स्नेहल, कल्पना ताई देशमुख ईत्यादींना मिळाले. हाऊजी गेम मध्ये बक्षीस अर्चना, संजीवनी, वर्षा, पोर्णिमा, अंजली, जया, मनिषा, सुचिता, विजया, साधना, रेवती, राखी, पल्लवी, संगीता, ईत्यादींना देण्यात आले. तसेच सरबत (थंड पेय) स्पर्धा घेण्यात आली त्याचे बक्षीस मनीषा देशमुख, तृप्ती देशमुख,सिमा सरनाईक असे देण्यात आले. तसेच मागील महिन्यातील शिवजयंती सजावट स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात आले रेवती देशमुख,अनीता देशमुख, वैशाली देशमुख, अपर्णा देशमुख, शिल्पा देशमुख यांना देण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी 'इरकल' ग्रुप च्या सदस्या छायाताई, ज्योती ताई, वासंती, निता, रुपाली, शितल, सुजाता ताई, सुनीता ताई, जया, माया ताई, वंदना ताई, मंजु ताई उज्वला संदीप देशमुख ताई,उज्वला योगेश देशमुख ताई, सुषमा ताई, प्रमिलाताई, अलका ताई, जयश्री ताई, कविता ताई, शुभांगी, यांनी परिश्रम घेतले. विविध कार्यक्रमात एप्रिल महिन्यातील देशमुख महिला मंडळाची मासिक सभा हर्षोल्लहात पार पडली.


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135


CMYK CMYK